महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः ११, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार ११ जून २०२४ ते सोमवार १७ जून २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301


## संक्षिप्त

### 'विधानसभेला जेवढ्या जागा शिंदे गटाला द्याल...'; जागावाटपाबाबत छगन भुजबळांची नवी मागणी!

■ मुंबई: प्रथमेश चव्हाण

विधानसभेला जेवढ्या जागा शिंदे गटाला मिळतील, तेवढ्याच जागा आम्हाला मिळाल्या पाहिजे, असं विधान राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी केलं आहे. तसेच आगामी विधानसभेत सर्वच जाती धर्माच्या लोकांना बरोबरीने घेऊन चालावं लागेल, असेही ते म्हणाले.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे विधान केलं.'आगामी विधानसभेत राष्ट्रवादीला ८० जागा मिळायला हव्यात, असं बोललो होतो. त्यानंतर माझ्या विरोधात अनेकजण बोलले. अशाप्रकारे काही बोलू नका, असं मला सांगण्यात आलं. मात्र, माझ्या मते जागावाटपाचं गुहाळ शेवटपर्यंत चालवून त्याचा फायदा आपल्याला होणार नाही. जागावाटपापबाबत लवकर निर्णय घ्यायला हवा, आधी जागा वाटप करून घ्यावं लागेल, त्यानंतर उमेदवार ठरवता येईल', अशी प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली. 'भाजपा हा मोठा पक्ष आहे. मोठा भाऊ आहे. आम्ही त्यांना सांगितलं की आमचे सुद्धा ४०-४५ आमदार आहेत. जवळपास तेवढचे आमदार शिंदे गटाचे सुद्धा आहेत. त्यामुळे शिंदेंना जेवढ्या जागा मिळतील, तेवढ्या जागा आम्हाला सुद्धा मिळाल्या पाहिजे.


### विक्रोळीत बांधकाम सुरू असलेल्या इमारतीचे छत कोसळून वडील-मुलाचा मृत्यू

■ मुंबई: रघुवीर जाधव

पहिल्याच पावसात विक्रोळी येथे रविवारी रात्री बांधकाम सुरू असलेल्या इमारतीचे छत कोसळून त्यात वडील-मुलाचा मृत्यू झाला. याबाबत विक्रोळी पार्कसाईट पोलीस अधिक तपास करत आहेत. विक्रोळीच्या पार्कसाईट



परिसरातील कैलास कॉम्प्लेक्स येथे रविवारी रात्री ही घटना घडली. गेल्या अनेक वर्षापासून अर्धवट बांधकाम झालेल्या इमारतीजवळ नागेश रेड्डी (३८) हे सुरक्षारक्षकाचे काम करत होते. रविवारी रात्रीही ते नेहमीप्रमाणे कामावर असताना त्यांना जेवणाचा डबा देण्यासाठी त्यांचा दहा वर्षाचा मुलगा रोहित रेड्डी तेथे गेला होता. त्याचवेळी जोरात पाऊस आल्याने दोघेही तेथील छज्जाखाली उभे होते. त्याचवेळी अचानक छज्जाचा काही भाग दोघांच्या अंगावर कोसळला. काही नागरिकांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत, दोघाना बाहेर काढले. त्यानंतर त्यांना घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले.



# तुमचे, माझे एकच लक्ष्य, विधानसभा अन् राज्यात सत्ता'; वर्धापनदिनी शरद पवारांचा निर्धार

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सोमवारी २५ वा वर्धापनदिन साजरा झाला. पक्षाचे संस्थापक शरद पवार यांच्या गटाचा अहमदनगरमध्ये हा वर्धापनदिन सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. त्याआधी पुण्यामध्ये पक्ष कार्यालयात ध्वजारोहन करण्यात आले. शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, सामाजिक कार्यकर्ते विश्वंभर चौधरी आदी नेते यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शरद पवार यांनी विधानसभेत सत्ता खेचून आणण्याचा निर्धार व्यक्त केला.**

■ मुंबई: विशाल कारंडे

शरद पवार म्हणाले, 'आजचा दिवस पक्ष स्थापनेला २५ वर्ष झाले, याबाबत आभार व्यक्त करण्याचा दिवस आहे. एक अशी संघटना उभी केली या संघटनेला महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर एक प्रकारचा नवा इतिहास तयार केला. अनेक गावामध्ये ज्यांच्या घरात सत्तेशी, राजकारणाशी संबंध नसणारे पण सामाजिक बांधिलकी असणारे अनेक तरुण पुढे आले अन् त्यातून त्या भागाचे नेतृत्व पुढे आले. ते नेतृत्व त्या भागापुरते मर्यादित न राहता जिल्ह्यावर, राज्यपातळीवर गेले. 'आज देश एका वेगळ्या स्थितीतून निघाला आहे. देशाची सत्ता मोदींच्या हातात आली पण खऱ्या अर्थाने निकाल मोदी सरकारच्या सोईचा नव्हता. संसदेत त्यांचे बहुमत नाही, अशी स्थिती निर्माण झाली. त्यांना इतर पक्षांची मदत झाली नसती तर सरकार आले नसते. गेल्या पाच वर्षात दोन व्यक्तींनी सरकार चालवले, सुदैवाने देशातील जनतेने याची नोंद घेऊन त्याप्रकारे मतदान केले, त्यामुळे सामान्य माणूस तुमच्या माझ्यापेक्षा अगदी शहाणा आहे. जागरुक आहे,' असे शरद पवार म्हणाले. 'गेले २५ वर्ष आपण विचारधारा वाढवण्याचा प्रयत्न केला. आता मजबुतीने आपण हा पक्ष आणखी पुढे नेऊया.

## मंत्रिपदावरून राष्ट्रवादी-भाजपात मतभेद? अजित पवार म्हणाले, '१५ ऑगस्टपर्यंत...'

■ मुंबई: संजीनी खाडे

नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाची तर भाजपासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (एनडीए) विविध पक्षांमधील ७१ खासदारांनी केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र एनडीएतील घटकपक्ष असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला एकही मंत्रिपद दिलेलं नाही. त्यामुळे अजित पवार आणि त्यांचा पक्ष एनडीएवर नाराज असल्याची चर्चा रंगू लागली आहे. तसेच मंत्रिपदावरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटात अंतर्गत वाद असल्याचीही अफवा उडाली होती. यावर स्वत: पक्षाचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही वेळापूर्वी स्पष्टीकरण दिलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित मेळाव्यात बोलत होते. अजित



पवार म्हणाले, काल मी दिल्लीत होतो. माझ्याबरोबर प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, संजय बनसोडे आणि समीर भुजबळ हे सर्व नेते उपस्थित होते. आम्ही काल दिवसभर एकत्र होतो. बऱ्याच विषयांवर आम्ही चर्चा केली. या चर्चेनंतर मी सर्वांना ठामपणे सांगतो की पक्षात किंवा महायुतीत कुठेही मतभेद नाहीत. कारण नसताना प्रसारमाध्यमे कधीकधी वेगवेगळ्या बातम्या दाखवतात, त्यातून अफवा पसरतात. त्याकडे तुम्ही दुर्लक्ष करा. प्रसारमाध्यमांशी फार संवाद साधला तर त्यातून वेगवेगळ्या बातम्या आणि गैरसमज पसरतात आणि आम्ही प्रसारमाध्यमांशी बातचीत केली नाही तर त्यांना असं वाटतं आमच्याशी बोलत नाहीत. मग ते त्यांना हव्या तशा बातम्या लावत सुटतात. कालही आपल्या पक्षाबद्दल काही बातम्या पसरवल्या गेल्या.

## २८८ मतदारसंघात ताकदीने कामाला लागा; उद्धव ठाकरेंचे आमदार, खासदारांसह पदाधिकाऱ्यांना आदेश

■ मुंबई: माधव अलवा

**महाराष्ट्रात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणून एकत्रित ताकदीनं लढू. परंतु २८८ मतदारसंघात संघटनात्मक बांधणीसाठी ताकदीनं कामाला लागा असा आदेश माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पक्षातील नेत्यांना दिले आहेत.**

शिवसेना भवन येथे आज जिल्हाप्रमुख, प्रमुख नेते, आमदार, खासदारांची बैठक उद्धव ठाकरेंनी घेतली. या बैठकीत लोकसभा निवडणुकीचा निकाल आणि येणाऱ्या निवडणुकीतील तयारीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीनंतर संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, महाविकास आघाडीच्या माध्यमातून आम्ही विधानसभा निवडणूक लढू आणि महाराष्ट्राची सत्ता काबीज करू. परंतु ते करत असतानाच संघटना बळकटीच्या दृष्टीने २८८ मतदारसंघात आज आहे त्यापेक्षा अधिक मजबूत करण्यासाठी कामाला लागा असं जिल्हाप्रमुखांना पक्षप्रमुखांनी आदेश दिलेत. एखादी विधानसभा आम्ही लढू किंवा नाही परंतु त्याठिकाणी २८८




मतदारसंघात संघटना जिद्दीने उभी राहिली पाहिजे असं बैठकीत ठरलं आहे. तसेच ज्या महाविकास आघाडीने एकत्रितपणे भाजपाला दिल्लीत बहुमतमुक्त केले, तीच महाविकास आघाडी महाराष्ट्रात पुन्हा एकत्रितपणे शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस ताकदीने विधानसभा जागा लढू आणि १८० ते १८५ जागा महाराष्ट्रात जिंकू असा निर्धार शिवसेनेच्या बैठकीत करण्यात आला. विधानसभेच्या दृष्टीने संघटना बांधणीसाठी पावसाळा असला तरी उद्धव ठाकरे मेळावे आणि सभेचं आयोजन करण्यात येत आहे. लवकरच त्याबाबत तारखा जाहीर करू असं सांगत संजय राऊतांनी मविआतच विधानसभा लढणार असल्याचं स्पष्ट केले.

दरम्यान, आज शिवसेना भवनात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात जिल्हाप्रमुख, प्रमुख नेते, आमदार, खासदार यांची बैठक झाली. मुंबईचे विभागप्रमुखही होते. संघटना बांधणीवर जोर देण्याबाबत चर्चा झाली. आम्ही विधानसभा निवडणूक ताकदीने लढू. २८८ मतदारसंघात संघटना बांधणी होणं गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक, पदवीधर, शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुका असतील त्याबाबतचा तयारीचा आढावाही आजच्या बैठकीत घेण्यात आला.



## बोगस वाण विक्रीची तक्रार व्हॉटसअॅपवर नोंदवा, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचं आवाहन

■ मुंबई: विशाल पाटील

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राज्याच्या खरीप हंगामाच्या नियोजनाचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी बी-बियाण्यांची चढ्या भावाने विक्री, बोगस वाण विक्री, अनावश्यक खरेदी सक्ती करणाऱ्याविरुद्ध शेतकऱ्यांसाठी 'कृषी तक्रार व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक' जारी करण्याचे निर्देश दिले. यासाठी कृषी विभागाकडून ९८२२४४६६५५ हा व्हॉट्सअॅप क्रमांक जारी करण्यात आला आहे. त्याचबरोबर तक्रारकर्त्यांचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाणार आहे. राज्यात कुठेही कृषी निविष्ठा विक्रेते शेतकऱ्यांना विशिष्ट कंपनीचे बियाणे किंवा खत घेण्याची सक्ती करीत असतील, बी-बियाणे, खते किंवा कीटकनाशकांची चढ्या भावाने विक्री करीत असतील, अनावश्यक वस्तू खरेदी करण्याची सक्ती करीत असतील, एखादे बोगस वाण विक्री करीत असतील किंवा शेतकऱ्यांच्या अन्य काही तक्रारी असतील, तर अशा विक्रेत्यांविरुद्ध तक्रारी ह्या दुकानाचे नाव, ठिकाण, तालुका, जिल्हा यांसह उपलब्ध असलेल्या पुराव्यासह वरील व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावेत. त्या प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेऊन, त्याची शहानिशा करून त्यावर कारवाई केली जाईल, त्याचबरोबर तक्रार देणाऱ्या शेतकऱ्यांचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, अशी माहिती धनंजय मुंडे यांनी दिली आहे.

## 'परिवहन'च्या कामकाजावर माजी आयुक्तांचेच बोट! मध्यस्थांसाठी यंत्रणा असल्याचा गंभीर आरोप

■ पुणे: अभिजीत येरल्लू

वाहन चालविण्याचा परवाना मिळविण्यासाठी नागरिकांना ऑनलाइन अर्ज करावा लागतो. या ऑनलाइन प्रक्रियेतील त्रुटी वारंवार समोर येतात. आता माजी परिवहन आयुक्त महेश झगडे यांनी या ऑनलाइन प्रक्रियेवर बोट ठेवले आहे. नागरिकांनी मध्यस्थांकडे जावे म्हणून ही प्रक्रिया अत्यंत किचकट करण्यात आली का, असा सवालही त्यांनी विचारला आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) अनेक सेवा ऑनलाइन देण्यात येतात. त्यात वाहन चालविण्याचा परवाना देण्याचा समावेश आहे. केंद्र सरकारच्या परिवहन मंत्रालयाच्या सारथी प्रणालीवर जाऊन यासाठी अर्ज करावा लागतो. ही प्रणाली राष्ट्रीय सूचना केंद्राने तयार केली असून, तिची देखभाल करण्याचे कामही त्यांच्याकडेच आहे. ऑनलाइन प्रक्रिया गुंतागुंतीची असल्याने अनेक जण स्वत: अर्ज करण्याऐवजी



मध्यस्थांकडे जातात. मध्यस्थांचे आर्थिक लागेबांधे आरटीओतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी असतात. त्यामुळे नागरिकांकडून पैसे घेऊन मध्यस्थ वाहन परवान्यासह इतर कामे चुटकीसरशी करून देतात.

माजी परिवहन आयुक्त महेश झगडे यांनाही ऑनलाइन प्रक्रियेचा आता अनुभव आला आहे. वाहन चालविण्याच्या परवान्याचे नूतनीकरण करण्यासाठी त्यांनी ऑनलाइन अर्ज केला. मात्र, ही प्रक्रिया अत्यंत किचकट असल्याचा अनुभव त्यांना आला. याबाबत झगडे म्हणाले की, नागरिकांना ऑनलाइन सेवा देताना ती अतिशय सहजसोप्या पद्धतीची असावी. ही प्रक्रिया अत्यंत किचकट आहे. मी परिवहन आयुक्त असताना अनावश्यक बाबी टाळून सोपी पद्धत ठरविली होती. ती पुन्हा लागू करण्यात यावी.

## पुढील २४ तासात मुंबईत अतिमुसळधार पावसाचा इशारा; कोकणात 'रेड अलर्ट'

■ मुंबई: यश सावंत

उकाड्यानं आता राज्यातून टप्प्याटप्प्यानं काढता पाय घेतला असून, राज्यत मान्सून मोठ्या मुक्कामासाठी पोहोचला आहे. सध्याच्या घडीला या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी चांगला जोर धरला असून, मुंबई पुण्यासह मराठवाड्यापर्यंत घोषणा केली. पुढील २४ तासांमध्ये मुंबई शहर आणि उपनगरामध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. यादरम्यान, शहरासह उपनगरीय क्षेत्रातील वातावरण पूर्णत: ढगाळ राहणार असल्याचं हवामान



मजल मारली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार यंदाच्या वर्षी मान्सूनची वेगानं प्रगती होताना दिसत असून देशाप्रमाणं राज्यातही तो अंदाजे वर्तवण्यात आलेल्या वेळेआधीच दाखल झाला.

सर्वसाधारणपणे मान्सून मुंबईत ११ जूनला दाखल होतो. यंदा मात्र मान्सून मुंबईत दोन दिवस आधिच दाखल झालाय. भारतीय हवामान विभागानं याबाबतची अधिकृत विभागानं सांगितलं आहे. पावसाची एकंदर वाटचाल पाहता हवामान खात्यानं ठाणे, रायगड, रत्नागिरीसाठी पावसाचा ऑरेंज अलर्ट, मुंबईसाठी यलो अलर्ट आणि कोकणात सिंधुदुर्गसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. इथं पावसानं हजेरी लावून ४८ तासांचा काळही उलटला नाही, तोच पहिल्याच पावसात मुंबईची तुंबई झाल्याचं पाहायला मिळालं.

## फी न भरल्यामुळे 100 विद्यार्थ्यांना शाळेबाहेर काढलं, ठाण्यातील धक्कादायक प्रकार


■ ठाणे : सचिन कदम

शाळेची वार्षिक फी न भरल्यामुळे १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शाळेबाहेर बसवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ठाण्याच्या पोलिस स्कूलमध्ये ही घटना घडली आहे. विद्यार्थ्यांना १२ जूनपर्यंत फी भरण्यासाठी वेळ देण्यात आला होता पण आज शाळा सुरू झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेबाहेर बसण्यात आले. यासंदर्भात पालकांनी तीव्र संताप व्यक्त केला. यासोबतच शिंदे गटाच्या युवासेनाप्रमुखांनी मुख्याध्यापकाला यासंदर्भात जाब विचारला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शाळेची फी भरण्यासाठी दोन दिवस बाकी असतानाही ठाणे पोलिस स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना




शाळेबाहेर काढण्यात आले आहे. शाळेच्या व्यवस्थापकांकडून विद्यार्थ्यांना शाळेबाहेर काढण्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. जवळपास १०० पेक्षा जास्त विद्यार्थी यामध्ये भरडले जात आहेत. शाळेने दिलेल्या फी भरण्याच्या अॅपमध्ये १२ जून ही शेवटची तारीख असतानाही आज शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यात आले.

ठाणे पोलिस स्कूल आजपासून सुरू झाले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थी सकाळी शाळेत आल्यानंतर थोड्याच वेळात पालकांना शाळेतून फोन गेले आणि तुमच्या पाल्यांची फी भरली नसल्याने तुम्ही त्यांना घेऊन जा असा निरोप देण्यात आला. यामुळे पालकांनी शाळेभोवती गराडा घातला असला तरी देखील शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच व्यवस्थापक यावर कोणतेही भाष्य करण्यास तयार नाहीत. शाळेतून बाहेर काढण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी या घटनेचा निषेध केला. शाळेकडून विद्यार्थ्यांवर ज्यापद्धतीने कारवाई करण्यात आली त्याबद्दल पालकांनी संताप व्यक्त केला. या घटनेनंतर शिवसेना युवासेना सचिव पूर्वेश सरनाईक यांनी शाळेचा मुख्याध्यापक यांना विचारणा केली असता त्यांनी जबाबदारी झटकली. या बाबतीत शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याकडे तक्रार करणार आली असल्याचे त्यांनी सांगितले.




# एकाधिकाराकडून लवचिकतेकडे

लोकसभा निवडणुकीच्या निकालांनी भाजपला जमिनीवर आणले आहे. यावेळी भाजपला राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांच्या मदतीशिवाय सरकार चालवणे शक्य नाही. आतापर्यंत एकाधिकारशाहीने सरकार चालविणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी नवे सरकार चालवताना किती लवचिक होतात तेही पाहणे महत्त्वाचे ठरेल. सलग तिसऱ्यांदा राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सत्तेत आली आहे. परंतु २०१४ आणि २०१९ मध्ये भाजप बहुसंख्येत असल्याने अन्य मित्रपक्षाला दुय्यम वागणूक मिळत गेली. सरकार 'एनडीए'चे असले, तरी ते भाजपचे सरकार म्हणून ओळखले गेले.

मोदी-शहांच्या भूमिकेमुळे सहकारी पक्ष दूर होत गेले. काही पक्षांचे तुकडे करण्यात भाजपला यश आले. राजकारणाचा चिंधीबाजार करणाऱ्या भाजपला मतदारांनीच आता जमिनीवर आणले आहे. यावेळी भाजपला एनडीएतील घटक पक्षांच्या मदतीशिवाय सरकार चालवणे शक्य नाही. आतापर्यंत एकाधिकारशाहीने सरकार चालविणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी नवे सरकार चालवताना किती लवचिक होतात तेही पाहणे महत्त्वाचे ठरेल. स्वभावात बदल झाला नाही, तर सत्तेतून कडेलोट होण्याची शक्यताच अधिक असेल. लोकसभेच्या २०२४ च्या निवडणुकांच्या निकालांनी भाजपला आणि विशेषत्वाने मोदी-शहांना मोठा धक्का दिला आहे. 'चारशे पार'च्या घोषणा करणाऱ्या मोदी यांच्या आशा कलचाचण्यांनी (एक्झिट पोल) पल्लवित केल्या होत्या. ता. एक जूनला मतदानाचा शेवटचा टप्पा आटोपल्यानंतर जी मतदानोत्तर कलचाचणी झाली, ती म्हणजे 'बेगानी शादी में अब्दुला दिवाना' यासारखी होती.



एकापेक्षा एक सरस आकडे आले, वृत्तवाहिन्यांचे पत्रकार या आकड्यांमागील मोदींच्या सुरस कथा सांगू लागले. मात्र, हा आनंद चार जूनला दुपारपर्यंतच कसाबसा टिकू शकला. निकाल लागल्यानंतर सगळ्याच भविष्यकार संस्था आणि व्यक्तींचा ढोल फुटला. मोदी पुराण सांगणाऱ्या टीव्ही पत्रकारांचे चेहरेही पडले. 'कलचाचण्यांच्या आकड्यांनी देशातील लोकांचा घात केला', असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. त्यांच्या मते हे बनावट 'एक्झिट पोल' होते. मोदी आणि शहा यांनी त्यांच्या मुलाखतींतून ४ जून रोजी भाजप विक्रमी आकडा गाठणार असल्याने शेअर बाजारही विक्रमी उच्चांक गाठेल, असे वक्तव्य केले होते. त्यामुळे लोकांनी शेअर्स खरेदी केले. प्रत्यक्षात निकालांनंतर शेअर बाजार कोसळला. सर्वसामान्य गुंतवणूकदारांचा ३० लाख कोटी रुपयांनी घात झाला. सेबीच्या चौकशीच्या फेऱ्यात असलेल्या एका समूहाच्या मालकीच्या टीव्ही वाहिन्यांना मोदी आणि शहांनी मुलाखती दिल्यात. यामागे मोदी-शहांच्या हेतूवर प्रश्न उभे करीत राहुल गांधी यांनी संयुक्त संसदीय समितीकडून (जेपीसी) चौकशीची मागणी केली आहे. काँग्रेसचा आकडा शंभरीनजीक गेल्याने राहुल गांधी पूर्ण जोशात आहेत. ते नव्या सरकारला अडचणीत आणण्यासाठी कोणतीही संधी सोडणार नाहीत. याआधी त्यांच्या प्रश्नांना मोदींकडून जराही दाद दिली जात नव्हती. संसदेत अतीच बोलतो म्हणून राहुल गांधींना संसदेतून आणि सरकारी घरातून बाहेर काढण्याचे काम भाजप आणि मोदी सरकारने केले. त्या पार्श्वभूमीवर २४० जागा जिंकूनही मनासारखे राज्य चालविता येणार नाही याची खंत मोदी यांना आहे. विरोधकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून संकट ओढवून घेणे त्यांना परवडणारे नसेल. मोदी लाटेने याआधीच्या दोन लोकसभा निवडणुका जिंकल्या, यात दुमत नाही. सन २०१४ मध्ये गुजरात मॉडेल घेऊन आलेले मोदी मतदारांच्या मनांत वसले. नंतर २०१९ मध्ये मोदी सरकारला महागाई, रोजगार हे विषय आव्हान देणारे होते; परंतु पुलवामा हल्ल्यानंतर लोकसभा निवडणुकीचे समीकरण बदलले. मोदींनी तो राष्ट्रवादाचा मुद्दा केला. यात मतदारांनी भाजपला ३०३ जागांवर विजय मिळवून दिला.



# रायगड जिल्हा पर्यटन


**येथील वैशिष्टय म्हणजे किनाऱ्यावरील एका रांगेत असणारी डौलदारपणे डुलणारी सुरूची झाडे व रूपेरी वाळूचा स्वच्छ सुंदर समुद्रकिनारा त्यावर फेसाळणाऱ्या अथांग समुद्राच्या पांढऱ्याशुभ्र लाटा पर्यटकांना फारच मोहीत करतात. येथे पर्यटकांसाठी नाष्टा जेवण तसेच निवासाच्या भरपूर सोयी आहेत. पर्यटक या किनाऱ्यावर इतके खुश आहेत कि महाराष्ट शासनाने पर्यटकांच्या ष्टीकोनातून या किनाऱ्याकडे विकासाकडे आपले लक्ष केंद्रीत केले आहे. पर्यटकांना मोहविणाऱ्या या निसर्गसंपन्न किनाऱ्याला जरूर भेट द्या.**

**किहिम बीच:** अलिबागपासून १२ कि.मी. अंतरावर इतर किनाऱ्याप्रमाणेच निसर्गाचे वरदान घेऊन किहीमचा रम्य किनारा निसर्गप्रेमिकांचे मन रिझवत आहे. अलिबाग-रेवस रस्त्यावरील चढी किहीम फाटयावर उतरल्यावर पश्चमेकडे जाणारा रस्ता हा किहीम गावातून समुद्रकिनारी जातो. छायाचित्रणासाठी आपणांस अनेक नैसर्गक सौंदर्यस्थळे या किनाऱ्यावर आढळतील. नारळीपोफळींची दाट वनश्री आणि आकाशाला गवसणी घालणारी सुरूची झाडे किनाऱ्याची शोभागिुणीत करतात. त्यामुळेच या किनाऱ्यावर पर्यटकांची खूप गर्दी असते. येथील सृष्टीसौंदर्यात आगळीच भर टाकणारा स्वच्छ नितळ अथांग सागर पर्यटकांना कुठल्याही ऋतुत आग्रहाचे निमंत्रण देत असतो.

या समुद्रकिनारी महाराष्ट पर्यटन विकास महामंडळातर्फे पर्यटकांसाठी तंबुंची सोय करण्यात आलेली आहे. निसर्गाच्या सान्निध्यात माडांच्या गर्द झाडीत समुद्राच्या कुशीत रहाण्याची मौज काही औरच मात्र ही मौज अनुभवयाची ती फक्त उन्हाळा किंवा हिवाळयातच. पावसाळयात तंबूत रहाण्याची मजा लुटता येत नाही. परुतु वर्षाचे बाराही महिने किहीम गावात अनेक ठिकाणी घरगुती रहाण्याची तसेच भोजनाची व्यवस्था होते.

**आक्षी बीच:** अलिबाग-खेदंडा रोडवर अलिबाग स्थानकापासून सुमारे ५ किमी. अंतरावर आक्षीचा किनारा आहे. येथे जाण्यासाठी आक्षी स्थानकाजवळ असलेल्या स्तंभाजवळून आतमध्ये एक ते दीड किमी. जावे लागते. स्वतचे वाहन असल्यास थेट किनाऱ्यापर्यंत आपण जाऊ शकता. किनारा स्वच्छ सुंदर प्रदुषणविरहित असून सुरूच्या बनांनी नटलेला आहे. या किनाऱ्यावरून आपल्याला अलिबाग बीचचे तसेच तसेच कुलाबा किल्ल्याचे दर्शन घडते.

**अलिबाग बीच:** अलिबाग एस. टी. स्थानकापासून सुमारे एक कि. मी. अंतरावर पश्चमेस साधारण ४-५ किमी. लांबीचा वालुकामय किनारा आहे. मारूती नाक्यावरून थेट पश्चमेला किनाऱ्याकडे जाणारा रस्ताही तितका स्वच्छ व हवेशीर. या रस्त्यावरून तुम्ही जेव्हा किनाऱ्याकडे जाल तेव्हा वाटेत सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालयाची इमारत, मुख्य पोस्ट ऑफिस, जिल्हा रूग्णालय, शासकीय विश्रामगृह, जिल्हा परिषद पत्रकार भवन ही अलिबागमधील महत्वाची ठिकाणे येतील. उजव्या हाताला



क्रिडाभुवनचे प्रशस्त मैदान लागेल. किनाऱ्यावर पोहोचल्यावर ऐतिहासिक कुलाबा किल्ल्याचे दर्शन होईल.

संपूर्ण किल्ल्याचे अवलोकन करीत मऊशार वाळूतून चालत असता किनाऱ्यावरील सुरूची उंचच उंच झाडे त्यांना साथ देणारी नारळाच्या झाडांची शोभा आपले मन खचितच मोहून टाकेल यात शंका नाही.

किनाऱ्यावरील खाजगी व सरकारी बंगल्यामुळे हा किनारा अधिकच खुलून दिसतो. शिवाय किनाऱ्यावर शहाळयाचे पाणी आईस्क्रम भेळपूरी पॅटीस इ. खादयपदार्थ विक्रेते क्षुधाशांतीसाठी आहेतच. सागरलाटांच्या खळाळत्या नादसौदर्याचा अनुभव येथेच घ्यावा. जसजसा सूर्य अस्तास लावू लागेल तेव्हा जरा क्षितीजाकडे नजर टाका व आकाशाच्या रंगपटावर उधळणाऱ्या सप्तरंगाची आतिषबाजी पहा. अशावेळी अंधुक प्रकाशात समोरील किल्ल्याचा गगनभेदी दरारा आपणांस हळूच इतिहासात ओढू लागेल. वाळूतून लगबगीने फले टाकीत पाठीवर जाळे सांभाळीत ओल्या कपडयांची पर्वा न करता आपल्या मस्तीत गात गात घरी निघालेल्या मच्छमार बांधवांच्या कोळीगीताला साथ देण्याचा मोह तुम्हाला आवरता येणार नाही.

अलिबाग एक सुंदर पर्यटन स्थळ म्हणून प्रसिध्दीस आल्यापासून अलिबाग बीचवर नेहमी प्रवाशांची वर्दळ असते. जरी वर्दळ असली तरी आवाजाचे प्रदूषण नाही. म्हणूनच ही बीच म्हणजे अलिबागचे एक वैशिष्टय आहे.

**काशिद बीच:** मुरूडच्या उत्तरेस जवळपास १८ किमी. अंतरावर गोव्यामधील बीचची आठवण करून देणारा रूपेरी वाळूचा स्वच्छ सुंदर काशिदचा समुद्रकिनारा विदेशी पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे.

काशिदच्या किनाऱ्यावरील सुरूंच्या नयनमनोहरी बागांतून विश्रांतीस थांबलेल्या पर्यटकांची गर्दी पाहूनच या स्थानाचे महत्व लक्षात येते. विकएंडला शेकडो पर्यटक इथे समुद्रस्नानासाठी जमतात. मॉडेलिंग टि.व्ही. सिरीयल व सिनेमांचे शूटींग येथे सातत्याने होत असते.

समुद्रकिनारी छोटया स्टॉलपासून परिपूर्ण सुविधा असणारी हॉटेल्स रिसॉर्टस् यामुळे काशिद बीच पर्यटकांचे मोठे आकर्षण बनला आहे.

**नागाव बीच:** येथे जाण्यासाठी अलिबाग एस.टी. स्थानाकापासून अलिबाग-रेवदंडा रस्त्यावर ७ किमी. अंतरावर असणाऱ्या नागांव ऑफीस येथे उतराव लागते. तेथील शिवछत्रपतीच्या पुतळयाजवळील रस्त्याने गेल्यावर दोन-अडीच किमी. अंतरावर हे बीच आहे. या बीचला साताड बंदर असेही म्हणतात.

येथील वैशिष्टय म्हणजे किनाऱ्यावरील एका रांगेत असणारी डौलदारपणे डुलणारी सुरूची झाडे व रूपेरी वाळूचा स्वच्छ सुंदर समुद्रकिनारा त्यावर फेसाळणाऱ्या अथांग समुद्राच्या पांढऱ्याशुभ्र लाटा पर्यटकांना फारच मोहीत करतात. येथे पर्यटकांसाठी नाष्टा जेवण तसेच निवासाच्या भरपूर सोयी आहेत. पर्यटक या किनाऱ्यावर इतके खुश आहेत कि महाराष्ट शासनाने पर्यटकांच्या ष्टीकोनातून या किनाऱ्याकडे विकासाकडे आपले लक्ष केंद्रीत केले आहे. पर्यटकांना मोहविणाऱ्या या निसर्गसंपन्न किनाऱ्याला जरूर भेट द्या.

**रेवदंडा बंदर:** अलिबाग स्थानकापासून १७ किमी. अंतरावर असणारे हे ऐतिहासिक बंदर आहे. याच ठिकाणी रोहयाहून येणाऱ्या कुंडलिका नदीचा अरबी समुद्राशी संगम होऊन खाडी तयार झाली आहे. रेवदंडा बंदराच्या पलिकडे साळाव गावापासून मुरूड तालुक्याची हद्द सुरू हते. या खाडीवर बांधलेला मुरूड आणि अलिबाग तालुके जोडणारा वाहतुकीच्या संदर्भात उपयुक्त ठरणारा साळाव खाडी पूल १९८६ पासून वाहतुकीस खुला झाला आहे.

या पुलावरून मुद्दामहून फेरफटका मारा. सभोवतालच्या नैसर्गिक परिसराची अजब किमया तुम्हाला गुंग करील.



साळावकडील टोकावरून संपूर्ण रेवदंडाचा परिसर सागराचे विलोभनीय दर्शन खाडीतील गलबतांची वहातुक तसेच डाव्या बाजूला दूरवर दिसणारे विक्रम इस्पात कंपनी तर उजव्या बाजूस या पुलाजवळच विक्रम इस्पात कंपनीची जेटी दिसते.


रेवदंडा बंदराजवळच एस.टी. स्थानक तसेच तीन व सहा आसनी रिक्षांचे स्थानक आहे. एस.टी. स्थानकाच्या मागील बाजूस खाडीत छोटासा धक्का पकटी आहे. या भागात मासेमारीचा व्यवसाय जोरात चालतो. मासे पकडून आणलेली गलबते होडया या धक्क्याजवळच थांबतात. या ठिकाणी ताज्या मासळीची खरेदी-विक्री होते.

**रेवस बंदर:** अलिबाग एस. टी. स्थानकापासून सुमारे २३ किमी. अंतरावरील हे बंदर मुंबई-रेवस वहातुकीमुळे एक महत्त्वाचे बंदर ठरले आहे. मुंबईहून लाचने येणारे प्रवासी तसेच उरणहून करंजामार्गे तरीने येणाऱ्या प्रवाशांची वर्दळ नेहमीच या बंदरावर असते. बंदराभोवतालचा सारा भूप्रदेश नैसर्गक सौंदर्याने नटलेला आहे.

धक्कयावर उभे राहिले असता समोर करंजाउरणचा किनारा उंच भागातील छोटे-छोटे बंगले मच्छमार बांधवांची गलबते तसेच लाटांवर डुलणाऱ्या होडयांची विलोभनीय दृष्ये नजरेस पडतात. हवामान स्वच्छ असल्यास मुंबईतील गगनचुंबी इमारतींचे दर्शनही खेस धक्कयावरून होते. या बंदराच्या परिसरात फिरताना एक वेगळाच आनंद मिळतो. धक्कयापासून जवळच एस. टी. स्थानक आहे तसेच तीन व सहा आसनी रिक्षांचीही उत्तम सोय आहे.

**मांडवा बंदर:** अलिबाग एस.टी. स्थानकापासून सुमारे १९ किमी. अंतरावर हे एक निसर्गसंपन्न बंदर आहे. अलिबाग-रेवस रस्त्यावर मांडवा फाटयावर उतरून बंदराकडे जावे लागते. इतर बंदरांप्रमाणे नैसर्गक सृष्टीसौंदर्याचे वरदान लाभल्यामुळे हे आगळेवेगळे असे पिकनिक पॉईंट झाले आहे.

या बंदराच्या धक्कयाला मुंबईहून (गेट वे ऑफ इंडिया) येणाऱ्या पी.एन.पी. सव्हसेस कॅटमरान अजंठा कॅटमरान यांच्या स्पीडबोट तसेच अजंठा सर्व्हीस अलसिद्दीक मोटार बोट लागतात. मांडव्याच्या समुद्रकिनारी अनेक धनिक लोकांचे बंगले तसेच फार्महाऊस आहेत.



**गंभीर मानसिक आजारांचे प्रमाण आपल्या समाजामध्ये सुमारे एक टक्का इतके आहे. म्हणजेच प्रत्येक गावात पाच-दहा तरी मनोरूग्ण असण्याची शक्यता आहे. याशिवाय सौम्य मनोविकार असलेल्यांची संख्या दहा टक्के इतकी असते. मात्र ब-याच वेळा यावर फार काही उपाय केला जात नाही. ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लवकर निदान, तज्ज्ञांकडून उपचार आणि पाठपुरावा व आधार देणे एवढया गोष्टी आपण करू शकतो.**

# मानसिक आरोग्य आणि आजार

जसे एखाद्याच्या पोटात दुखते तसेच मनाचेही दुखणे असू शकते, पण शारीरिक आजारांपेक्षा मानसिक आजारांकडे पाहण्याची समाजाची दृष्टी वेगळी असते. मानसिक आजारांबद्दल गूढतेचे, भीतीचे, करणी-जारणमरण, इत्यादींचे वलय असते. सर्वसाधारण वैद्यकीय वर्तुळातही याबद्दल फार माहिती नसते. त्यामुळे पोटदुखी, कानदुखीकरता जसे आपण चटकन डॉक्टरकडे जातो तसे मानसिक आजाराबद्दल जात नाही. यावरचे वैद्यकीय उपचार म्हणजे विजेचे शॉक, मनोरुग्णालयात दाखल करणे, इत्यादी भीतीदायक कल्पना असतात. त्यामुळे मानसिक आजारांच्या बाबतीत वैद्यकीय सल्ला न घेता काही जण मांत्रिकाकडे जातात. शहरांत आणि खेडयांतही ब-याच किरकोळ मानसिक आजारांमध्ये काही लोक मांत्रिक-गुरु यांची मदत मागतात. आपले दुखणे कोणीतरी 'दैवी' माणूस नीट ऐकून घेतो आहे असे पाहून, थोडाफार फरक पडतो. यामुळे काही जणांना समाधान मिळते. पण मारझोड, बांधून ठेवणे, धुरी देणे, उपाशी ठेवणे, इत्यादी अघोरी प्रकारही केले जातात. अनेकवेळा यात रुग्ण दगावण्याची उदाहरणे आहेत.

**समुपदेशन उपचार**

घरातल्या, गावातल्या शांत, वडीलधा-या, प्रेमळ माणसाने दुखणे ऐकून घेणे व धीर देत राहणे याने किरकोळ मानसिक दुखण्यांचा विसर पडतो. हा एक प्रकारचा समुपदेशन उपचारच आहे. मात्र गंभीर प्रकारच्या दुखण्यांत वैद्यकीय उपचार आवश्यक असतात. वेळीच उपचार झाले तर इतर शारीरिक आजारांप्रमाणेच काही मानसिक रुग्णही बरे होऊ शकतात.

गंभीर मानसिक आजारांचे प्रमाण आपल्या समाजामध्ये सुमारे एक टक्का इतके आहे. म्हणजेच प्रत्येक गावात पाच-दहा तरी मनोरुग्ण असण्याची शक्यता आहे. याशिवाय सौम्य मनोविकार असलेल्यांची संख्या दहा टक्के इतकी असते. मात्र ब-याच वेळा यावर फार काही उपाय केला जात नाही. ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लवकर निदान, तज्ज्ञांकडून उपचार आणि पाठपुरावा व आधार देणे एवढया गोष्टी आपण करू शकतो.

**मानसिक आजाराचे वर्गीकरण**

मानसिक आजाराचे वर्गीकरण अनेक प्रकारे करता येते. या पुस्तकात सोपी पध्दत वापरलेली आहे.

जीवशास्त्रातल्या अनेक गोष्टी आणि घटनांसंबंधी, 'अमुक इथपर्यंत योग्य, तिथून पुढे वाईट' अशा मर्यादा आखता येत नाहीत. उदा. १४० पुढे रक्तदाब असेल तर तो'अतिरक्तदाब' आहे असा शिक्का मारला जातो, पण १३९ असेल तर तो योग्यच आहे आणि १४१ असेल तर जास्तच आहे अशी काटेकोर भूमिका घेणे अशक्य असते. तसेच रक्तदाब असणे ही गोष्ट आवश्यक व नैसर्गिक आहे आणि जास्त असणे आजार आहे. मानसिक आजारांच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. योग्यप्रमाणात भावभावना असणे नैसर्गिक आहे. उदा. 'संताप' हा घटक घेऊ या. थोडा संताप असणे संरक्षणासाठी आवश्यक आहे. पण अकारण, अवाजवी संताप हे मानसिक दोषांत मोडेल. आनंदी स्वभाव चांगला खरा, पण सतत 'हवेत असणे' मानसिक दौर्बल्याचे लक्षण आहे. दुःख असणे स्वाभाविक,पण सतत खूप दुःखी असणे 'मनोविकार' म्हणता येईल. गुणदोषांची थोडी जास्त मात्रा कधीकधी प्रगतीही साधू शकते. उदा. नादिष्ट, छंदिष्टपणातून कलानिर्मिती व शास्त्रीय प्रगती होऊ शकते. सर्वसाधारणपणे टोकाच्या प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून समाजातील बदलाची पावले पडू शकतात. असे असले तरी मानसिक दोष जास्त असेल तर मात्र उपचाराची गरज लागते.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# २६३ कोटी रुपयांचा प्राप्तिकर गैरव्यवहार, मालमत्तांची कागदपत्रे बनावट असल्याचे ईडी तपासात निष्पन्न

■ मुंबई: यश सावंत

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) २६३ कोटी रुपयांच्या प्राप्तिकर गैरव्यवहारप्रकरणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याचे पती पुरुषोत्तम चव्हाण यांना अटक केली होती. चव्हाण यांच्या घरात राबवण्यात आलेल्या शोध मोहिमेत सापडलेली मालमत्तांची कागदपत्रे बनावट असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याबाबतची माहिती ईडी लवकरच मुंबई पोलिसांना देणार आहे. सरकारी आरक्षणातून स्वस्तात मालमत्ता मिळवून देण्याचे आमिष दाखवून चव्हाण यांनी अनेकांकडून या बनावट कागदपत्रांद्वारे पैसे घेतल्याचा आरोप आहे. रजिस्ट्रार कार्यालय, बँकांकडे या कागदपत्रांबाबत केलेल्या तपासणीत ते बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात माजी वरिष्ठ करसाहाय्यक तानाजी मंडल अधिकारी, त्यांचे साथीदार भूषण पाटील, राजेश शेट्टी, राजेश बत्रेजा व चव्हाण यांना अटक करण्यात आली होती. २००७-०८ आणि २००८-०९




या आर्थिक वर्षासाठी बनावट परतावा जारी केल्याप्रकरणी अतिरिक्त महासंचालक (दक्षता) – ४ सीबीडीटी यांनी लेखी तक्रारी केली होती. त्याप्रकरणी दिल्ली सीबीआयने गुन्हा दाखल केला.

ईडीने केलेल्या तपासानुसार, १५ नोव्हेंबर २०१९ ते ४ नोव्हेंबर २०२० या कालावधीत अधिकाऱ्यांनी एकूण १२ बनावट टीडीएस परताव्यांद्वारे २६३ कोटी ९५ लाख ३१ हजार ८७० रुपयांचा गैरव्यवहार केला. ती रक्कम भूषण पाटील याच्या मालकीच्या कंपनीच्या बँक खात्यात जमा झाली. ती रक्कम पुढे भूषण पाटील व इतर संबंधित व्यक्तींच्या बँक खात्यामध्ये, तसेच बनावट कंपन्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आली. यापूर्वी अटक करण्यात आलेला आरोपी बत्रेजाने ही रक्कम इतरत्र वळवण्यास आरोपींना मदत केली. राजेश बत्रेजा आणि पुरुषोत्तम चव्हाण नियमितपणे संपर्कात होते आणि हवाला व्यवहार आणि गुन्ह्यातील रक्कम वळवण्याशी संबंधित संदेशही एकमेकांना केल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

# केईएम रुग्णालयातील तंबाखू बंद क्लिनिक अद्ययावत होणार

■ मुंबई: विशाल कारंडे

सुमारे २० वर्षांहून अधिक काळ राजे एडवर्ड स्मारक अर्थात केईएम रुग्णालयातील 'तंबाखू बंद' क्लिनिक अद्ययावत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी रुग्णालय प्रशासनाने बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशनबरोबर सामंजस्य करार केला आहे. तंबाखू सेवन करण्याची सवय ही इतर अनेक व्यसनांसाठी कारणीभूत ठरते. त्यातून अनेक रोगांना आमंत्रण मिळते. किशोरवयीन आणि तरुण पिढीमध्येही हे व्यसन आढळून येते. केईएम रुग्णालयातील मानसोपचार विभागामध्ये १९९१ पासून 'ड्रग डेडिक्शन सेंटर ऑफ एक्सलन्स' हा विभाग सुरू आहे. तसेच २० वर्षांपासून प्रत्येक बुधवारी सकाळी 'तंबाखू बंद क्लिनिक' संचालित केले जात आहे. तंबाखू अधीन झालेल्या रुग्णांना तंबाखू सोडण्यास मदत करण्यासाठी निकोटीन रिप्लेसमेंट, फार्माकोथेरपी (व्हॅरेनिकलीन / बुप्रोपियन), समुपदेशन आणि वर्तन सुधारणा सेवा इत्यादी उपक्रम या माध्यमातून




राबवले जातात. केईएम रुग्णालयाच्या या उपक्रमाला हातभार लावण्यासाठी बजाज इलेक्ट्रिकल फाउंडेशनने पुढाकार घेतला आहे. बजाज इलेक्ट्रिकल फाऊंडेशनच्या (बीईएफ) सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर फंड) केईएम रुग्णालयातील 'तंबाखू बंद क्लिनिक' अद्ययावत करण्यात येणार आहे. रुग्णांच्या नोंदी, विनामूल्य औषधोपचार आणि समुदाय जागरूकता कार्यक्रमांसाठी या उपक्रमाची मदत होणार आहे. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आणि बजाज फाऊंडेशनच्या विशेष कार्यकारी अधिकारी मधुरा तळेगावकर यांनी या संयुक्त उपक्रमासाठी एक वर्षाच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. याद्वारे 'तंबाखू बंद क्लिनिक' द्वारे रुग्णांना अधिक अद्ययावत आणि दर्जेदार वैद्यकीय सेवा पुरवणे शक्य होणार आहे.एका सर्वेक्षणानुसार २०१६-१७ मध्ये भारतातील वयवर्षे १५ आणि त्याहून अधिक वयाच्या एकूण २८ कोटी ७ लाख नागरिक तंबाखूचे सेवन करतात. याच सर्वेक्षणानुसार ५ पैकी १ प्रौढ (म्हणजे अंदाजे २० कोटी) व्यक्ती धूररहित तंबाखूचे सेवन करतात. तर १० पैकी १ प्रौढ (१० कोटींहून अधिक) तंबाखूचे सेवन करतात.

# अतिक्रमणाविरोधात कारवाईपूर्वी महापालिकेने प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे

■ मुंबई: माधव अलवा

पवई येथील भीमनगर परिसरात अनधिकृत झोपड्यांवर गुरुवारी मुंबई महापालिकेने तोडक कारवाई केली. मात्र अतिक्रमाविरोधात कारवाई करण्यापूर्वी महापालिकेने प्रक्रिया पूर्ण करणे गरजेचे आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र



आव्हाड यांनी व्यक्त केले. आव्हाड यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन त्यांचे म्हणणे मांडले. पात्र झोपडीधारकांना स्थलांतर करणे गरजेचे होते किंवा झोपु योजनेत समाविष्ट करायला हवे, असे ते म्हणाले.

पवईच्या जय भीम नगर भागात पालिकेच्या एस विभाग कार्यालयामार्फत अतिक्रमण हटवण्याबाबत ३ जून रोजी नोटीस देण्यात आली होती. त्यानुसार पालिका अधिकारी, कर्मचारी गुरुवारी ६ जून रोजी कारवाई केली. कारवाईदरम्यान पात्र झोपडीधारकांनाही हटविण्यात आले असल्याचे आव्हड यांनी सांगितले. दरम्यान, घटनास्थळी आव्हाडांनी पाहणी केला असता त्या ठिकाणी काँक्रिट टाकून चार खांब उभे करून त्यावर पत्रे लावण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. १ जून ते ३० सप्टेंबर या काळात कोणतेही अनधिकृत घर निवासी घर त्याचे निष्कासन करता येणार नाही असे परिपत्रक सरकारने पूर्वीच जारी केले. आहे. राज्य मानव अधिकार आयोगाला कोणतीही माहिती न देता ही कारवाई पालिकने केल्याचा आरोप आव्हाड यांनी केला.

भीम नगरामध्ये अनेक जण गेल्या २५ वर्षांपासून वास्तव्यास आहेत. वईगाव व मौजे तिरंदाज गाव येथील भूखंडावर सुमारे ५०० झोपड्या असलेली लेबर हटमेंट तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात आली होती. या झोपड्यांवर कारवाई करावी, असे आदेश राज्य मानव अधिकार आयोगाने महापालिकेला दिले होते. अतिक्रमण हटवण्याबाबत ३ जून रोजी नोटीस देण्यात आली होती. त्यानुसार पालिका अधिकारी, कर्मचारी संबंधित यंत्रणा गुरुवारी सकाळी घटनास्थळी दाखल झाल्या. वस्तीच्या प्रवेशद्वारावरच रहिवासी मोठ्या संख्येने जमले होते. काही झोपड्या जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आल्या. मात्र त्यानंतर जमावाने पालिका अधिकारी आणि पोलिसांना जोरदार विरोध केला.

# घाटकोपर जाहिरात फलक दुर्घटनाः जाहिरात कंपनीच्या माजी संचालकासह दोघांना अटक

■ मुंबई: संजीनी खाडे

घाटकोपरमधील पेट्रोल पंपावर जाहिरातीचा महाकाय फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी विशेष तपास पथकाने इगो मीडिया कंपनीची माजी संचालक जान्हवी मराठेसह तिचा साथीदार सागर पाटील याला गोव्यावरून अटक केली. जाहिरात फलक देखरेख करण्याचे काम पाटील करीत होता. दोघेही गेल्या काही दिवसांपासून गोव्यातील एका हॉटेलमध्ये वास्तव्याला होते. जाहिरात फलक कोसळल्यापासून मराठे बेपत्ता होती आणि तिचा अटकपूर्व जामीन अर्जही फेटाळण्यात आला होता. घाटकोपर येथील पेट्रोल पंपावर १३ मे रोजी जाहिरात फलक कोसळून १७ जणांचा मृत्यू झाला होता. मराठे आणि पाटील यांना गोव्यातील एका हॉटेलमधून अटक करण्यात आली. त्यांना विमानाने मुंबई आणण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. त्यांचे मोबाइल बंद होते. त्यामुळे गेल्या काही आठवड्यांपासून पोलीस त्यांच्या शोधात होते. मराठे नोव्हेंबर २०२३ पर्यंत कंपनीची संचालक होती. त्यानंतर या प्रकरणातील अटक आरोपी भावेश भिंडे संचालक झाला. यापूर्वी काळ्या यादीत टाकण्यात आल्याने भिंडे यांनी मराठेच्या नावावर कंपनीची नोंदणी केल्याचे पोलिसांनी सांगितले. पण दोघांमध्ये वाद झाल्यामुळे



डिसेंबर २०२३ मध्ये भिंडे पुन्हा कंपनीचा संचालक झाला. आरोपी त्यांचा मोबाइल बंद ठेवत होते. दूरध्वनी करण्यासाठी १२ किलोमीटर दूरचा प्रवास करीत होते. त्यानंतर पुन्हा दूरध्वनी बंद करीत होते. त्यामुळे त्यांचा शोध घेणे कठीण झाले होते. त्यांच्या शोधासाठी आणखी दोन पथके गोव्यात पाठवण्यात आली होती. मराठे आणि पाटील या दोघांना शनिवारी संध्याकाळी अटक करण्यात आली. त्यानंतर रविवारी त्यांना सुटीकालीन न्यायालयीपुढे हजर करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. या प्रकरणातील एकूण अटक आरोपींची संख्या आता चार झाली आहे. यापूर्वी अटक केलेल्या दोघांमध्ये इगो मीडिया कंपनीचे सध्याचे मालक भावेश भिंडे आणि जाहिरात फलकासाठी सुरक्षा प्रमाणपत्र देणारा अभियंता मनोज संघू यांचा समावेश आहे. दोन्ही आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

दुर्घटनाग्रस्त जाहिरात फलक उभारण्याबाबत रेल्वे पोलिसांकडून इगो मीडिया कंपनीला परवानगी मिळाली, त्यावेळी मराठे कंपनीची संचालक होती. तर या बांधकामावर देखरेख करण्याचे काम पाटीलचे होते. व्हीजेटीआय येथील तज्ज्ञांनी दुर्घटनाग्रस्त जाहिरात फलकाची पाहणी करून विशेष तपास पथकाला अहवाल सादर केला होता.

# कोकण रेल्वे मार्गावरील तीन अतिजलद एक्स्प्रेस दादरपर्यंत धावणार

■ मुंबई: विशाल पाटील

मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसच्या (सीएसएमटी) अभियांत्रिकी – विद्युतीकरणाशी संबंधित इंटरलॉकिंगची कामे पूर्ण झाली आहेत. मात्र, आता या कामामधील त्रुटी निदर्शनास आल्याने लोकल आणि लांबपल्ल्याच्या रेल्वेगाड्यांवर परिणाम होत आहे. रेल्वेगाड्या अंशत: रद्द केल्याने प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. तसेच त्यांना इच्छितस्थळी पोहोचण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर, दुसरीकडे लोकल उशिराने धावत असल्याने प्रवाशांना विलंबयातना सहन कराव्या लागत आहेत. यातच आता मध्य आणि कोकण रेल्वे मार्गावरील तेजस, जनशताब्दी आणि मंगळुरू – सीएसएमटी



रेल्वेगाड्या ७ जुलैपर्यंत दादर स्थानकावरच स्थगित करण्यात येणार आहेत. मध्य रेल्वेने सीएसएमटी स्थानकातील फलाट क्रमांक १०, ११, १२, १३ च्या विस्तारीकरणाची कामे हाती घेतल्यामुळे कोकणातील रेल्वेगाड्यांच्या थांब्यावर परिणाम झाला आहे. या चार फलाटांच्या विस्तारीकरणाच्या कामामुळे गाडी क्रमांक १२१३४ मंगळुरू – सीएसएमटी, गाडी क्रमांक २२१२० मडगाव – सीएसएमटी तेजस एक्स्प्रेस, गाडी क्रमांक १२०५२ मडगाव – सीएसएमटी जनशताब्दी एक्स्प्रेस या तिन्ही अतिजलद रेल्वेगाड्या ७ जुलैपर्यंत दादर स्थानकातच स्थगित करण्यात येतील, अशी माहिती कोकण रेल्वेकडून देण्यात आली. सीएसएमटी येथील ब्लॉकनंतर सर्व रेल्वेगाड्या सुरळीत धावतील. तसेच रेल्वेगाड्यांच्या डब्यात वाढ करण्याची घोषणा होईल, असा विश्वास प्रवाशांना

# पश्चिम रेल्वेवर विनातिकीट प्रवाशांची धरपकडच दंडापोटी ३८ कोटी रुपये वसूल

■ मुंबई: नितीन देवळेकर

पश्चिम रेल्वेवरील प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी प्रवास मिळावा यासाठी लोकल, मेल / एक्स्प्रेस, तसेच पॅसेजर रेल्वे आणि सुट्टीकालीन विशेष ट्रेनमधील विनातिकीट / अनियमित प्रवाशांना आळा घालण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. एप्रिल, मे २०२४ मध्ये पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ व्यावसायिक अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली तिकीट तपासणी पथकाने अनेक तिकीट तपासणी मोहीम राबविल्या.

याद्वारे पश्चिम रेल्वेवरील विनातिकीट प्रवाशांना पकडून एप्रिल, मे या दोन महिन्यात ३८ कोटी रुपये दंड वसूल केला. मे २०२४ मध्ये



आरक्षित न केलेल्या सामानासह २.८० लाख विनातिकीट / अनियमित प्रवाशांना पकडून १७.१९ कोटी रुपये वसूल करण्यात आले. याशिवाय मे महिन्यात पश्चिम रेल्वेने मुंबई उपनगरीय विभागात एक लाख प्रकरणे शोधून ४.७१ कोटी रुपये दंड वसूल करण्यात आला. वातानुकूलित लोकलमध्ये विनातिकीट प्रवाशांना पकडण्यासाठी भरारी पथकाद्वारे तिकीट तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमांद्वारे एप्रिल – मे या कालावधीत ८,५०० विनातिकीट प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच, त्यांच्याकडून २९ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला.

# पदवीधरमधील उमेदवार 'श्रीमंत', गुन्हेही दाखल

■ मुंबई: नितीन देवळेकर

विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातही तळमळीने काम करणाऱ्यांपेक्षा श्रीमंत आणि फसवणुकीपासून भ्रष्टाचारापर्यंत गुन्हे दाखल असलेले उमेदवार रिंगणात आहेत. कोकण पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढविणारे भाजपचे विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांची ५५ कोटींची मालमत्ता असल्याची माहिती त्यांनी प्रतिज्ञापत्रात दिली आहे. मुंबई पदवीधरमधील शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार अनिल परब यांची ३२ कोटींची मालमत्ता आहे. डावखरे यांच्यावर करोना काळात टाळेबंदीचे उल्लंघन करून करोना रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी आंदोलन केल्याबद्दल दोन गुन्हे दाखल आहेत. डावखरे यांच्याकडे ९५५ ग्रॅम सोने, ५.८ किलो चांदी, गाडी, विविध वित्तीय संस्थामधील गुंतवणूक अशी १७ कोटी ६८ लाखांची जंगम मालमत्ता आहे. तसेच शिरुर, हवेली (पुणे) येथे शेतजमीन, महाबळेश्वर येथे बंगला, येऊर येथे जमीन मुंबई, ठाण्यात व्यावसायिक आणि निवासी जागा अशी ३८



कोटींची स्थावर मालमत्ता आहे. तर विविध वित्तीय संस्थांचे ९ कोटींचे दायित्वही आहे.

अनिल परब यांच्यावर राजकीय आंदोलन, ध्वनी प्रदूषण, सरकारी कामात अडथळा, दंगल यासोबतच दापोलीतील रिसॉर्ट प्रकरणात अनाधिकृत बांधकाम, फसवणूक, भ्रष्टाचार, एमआरटीपी असे विविध पोलीस ठाण्यात २४ गुन्हे दाखल असून प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. परब आणि त्यांच्या कुटुंबियांची जंगम मालमत्ता १९ कोटींची तर स्थावर मालमत्ता १३ कोटींची असून ४ कोटी ८६ लाखांचे वित्तीय संस्थांचे दायित्व आहे. परब यांच्याकडे सुमारे २२१५ ग्रॅम (१९० तोळे) सोने. चांदीचे दागिने, वित्तीय संस्थांमधील गुंतवणूक, मुंबईत व्यापारी गाळे, फ्लॅट तसेच कर्जतला शेत जमीन आहे. तर दीपक सावंत यांची जंगम मालमत्ता ८ कोटी ४९ लाख त्यांच्याकडे १०५ तोळे सोने-चांदीचे दागिने आहेत. सावंत यांच्या १६ कोटींची स्थावर मालमत्ता असून सुमारे ६० लाखाचे दायित्व आहे. शिवसेनेचे संजय मोरे पदवीधर असून त्यांच्यावरही राजकीय आंदोलनाचे तीन गुन्हे दाखल आहेत.

# एक तृतीयांश विधान परिषद रिकामी! आधीच्या २२ जागांमध्ये पुढील आठवड्यात आणखी पाच जागांची भर पडणार

■ मुंबई: सम्यक कासारे

**विधान परिषदेच्या २२ जागा रिक्त असताना पुढील आठवड्यात आणखी पाच जागा रिक्त होत असल्याने ७८ पैकी एक तृतीयांश विधान परिषद रिक्त राहणार आहे. राज्यपाल नियुक्त १२ जागा तसेच महनगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघाच्या १५ जागा अशा २७ जागा लगेचच भरल्या जाण्याचीही चिन्हे नाहीत.**

महाराष्ट्र विधान परिषदेचे एकूण ७८ सदस्य आहेत. यापैकी राज्यपाल नियुक्त १२ जागा या गेली चार वर्षे रिक्त आहेत. महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका गेली अनेक वर्षे झालेल्या नसल्याने स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या १५ जागा रिक्त होत आहेत. सध्या २२ जागा रिक्त असून, पुढील आठवड्यात आणखी पाच जागांची त्यात भर पडेल. विधान परिषदेचे सभापतीपदही गेली दोन वर्षे रिक्त असून उपसभापती नीलम गोऱ्हे याच सभागृहाचे कामकाज बघतात.दोन वर्षे सभापती नाही. एक तृतीयांश जागा रिक्त अशी वेळ विधान परिषदेच्या इतिहासात कधीच आली नव्हती. विधान परिषदेतील ३० जागा या विधानसभा सदस्यांकडून निवडल्या जातात. २२ जागा या स्थानिक प्राधिकारी संस्था मतदारसंघातून, सात जागा पदवीधर तर सात जागा शिक्षक अशा १४ जागा निवडल्या जातात. उर्वरित १२ जागा या राज्यपाल नियुक्त सदस्यांसाठी असतात. त्याही रिक्त आहेत. नगरसेवकांकडून निवडून येणाऱ्या स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या २२ पैकी १५ जागा रिक्त होतील. महापालिका वा नगरपालिकांच्या निवडणुका जोपर्यंत होत नाहीत तोपर्यंत या १५ जागा भरल्या जाणार नाहीत. ऑक्टोबरमधील विधानसभेच्या निवडणुका पार पडल्यावरच पुढील वर्षी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची चिन्हे दिसतात. म्हणजेच २०२५ पर्यंत या १५ जागा रिक्त राहतील अशीच चिन्हे आहेत. विधान परिषद हे निरंतर चालणारे सभागृह आहे. यामुळे



विधानसभेप्रमाणे हे सभागृह बरखास्त करता येत नाही. राज्य विधानसभेने ठराव करून शिफारस केल्यास संसदेला विधान परिषद रद्द काढण्याचा अधिकार आहे. ७८ पैकी २७ जागा रिक्त होत असल्यास ते केव्हाही संयुक्तीक नाही. कायदेशीर अडचणींमुळेच या जागा भरणे शक्य होत नसेल. पण कोणत्याही सभागृहाच्या जागा जास्त काळ रिक्त राहता कामा नयेत.– विलास पाटील, निवृत्त प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ.


विधानसभेतून निवडून द्यायच्या ११ जागा जुलैमध्ये रिक्त होत आहेत. या जागांसाठी लवकरच निवडणूक जाहीर होईल. निवडून येण्याकरिता पहिल्या पसंतीच्या २३ मतांची आवश्यकता असेल. १०५ सदस्य असलेल्या भाजपचे अपक्षांच्या पाठिंब्यामुळे पाच उमेदवार सहजच निवडून येऊ शकतात. काँग्रेस, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचा प्रत्येकी एक उमेदवार निवडून येईल. शिंदे आणि अजित पवार गटाकडील अतिरिक्त मतांच्या आधारे गटाकडील अतिरिक्त मते तसेच भाजपला पाठिंबा असलेल्या अपक्षांच्या बळावर महायुतीचा आणखी दोन उमेदवार निवडून आणण्याचे प्रयत्न होऊ शकतात. शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचा संयुक्त उमेदवार निवडून येऊ शकतो.

# झोपडीवासीयांना भाड्याची सद्यःस्थिती मोबाईलवरच कळणार, प्राधिकरणाकडून स्वतंत्र ॲप लवकरच कार्यान्वित

■ मुंबई: विशाल कारंडे

झोपडीवासीयांना आता विकासकांकडून मिळणाऱ्या भाड्याची सद्यःस्थिती काय आहे, भाडे कधी जमा होणार वा जमा झाले असल्याचा त्याचा तपशील आदी बाबी आता मोबाईलवर लवकरच कळू शकणार आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने याबाबत 'भाडे व्यवस्थापन यंत्रणा'असे स्वतंत्र ॲप कार्यान्वित केले आहे. या ॲपवर झोपडीवासीयाला मोबाईल क्रमांक, ईमेल असा तपशील देऊन नोंदणी करता येणार आहे. त्याद्वारे त्याला भाडेविषयक संपूर्ण तपशील प्राधिकरणात खेटे न घालता पाहता येणार आहे. गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर-सिंग यांनी या ॲपला हिरवा कंदिल दाखविला आहे. प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून या ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. कल्याणकर यांनी सूत्रे स्वीकारताच याबाबत तात्काळ कार्यवाही सुरू केली होती. हे ॲप लवकरच कार्यान्वित केले जाणार आहे. यामुळे झोपडीवासीयांना भाड्याची निश्चित स्थिती कळू शकणार आहे.

झोपडीवासीयांच्या भाड्याचा प्रश्न संवेदनाक्षम असून थकित भाड्यापोटी उच्च न्यायालयानेही प्राधिकरणाची चांगलीच खरडपट्टी काढली होती. त्यानंतर प्राधिकरणाने २१० क्रमांकाचे परिपत्रक जारी केले. या परिपत्रकानुसार, झोपडपट्टी पुनर्वसन



योजना राबविण्यापूर्वी विकासकाने झोपडीवासीयांना दोन वर्षांचे आगाऊ भाडे आणि त्यानंतर पुढील वर्षभराचे धनादेश प्राधिकरणाकडे जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. कुठलीही रखडलेली योजनाही पुन्हा सुरू करण्यासाठी विकासकाला या परिपत्रकाची अंमलबजावणी केल्याशिवाय काम सुरू करण्याचे पत्र दिले जात नाही. हे भाडे प्राधिकरणाकडून झोपडीवासीयांना दिले जाते. या परिपत्रकामुळे थकित भाड्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात कमी झाल्या आहेत. आता एक पाऊल पुढे जात, प्राधिकरणाने भाडेविषयक कुठलीही तक्रार असल्यास ॲपवर नोंदविण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. या शिवाय आता प्रत्येक झोपडीवासीयाला आपल्या भाड्याची सद्यःस्थितीही कळू शकणार आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे आतापर्यंत हजार कोटी रुपये भाड्यांपोटी जमा झाले आहे. हे भाडे झोपडीवासीयांना प्रत्यक्षात देण्यासाठी प्राधिकरणाने सहायक निबंधक संध्या बावनकुळे यांच्यावर जबाबदारी सोपविली आहे. याशिवाय आता अपवर कुठल्या योजनेत, कोणत्या विकासकाने भाडे दिलेले नाही आदी तपशील ॲपवर सहजगत्या उपलब्ध होणार आहे.

# उरणमध्ये १५ गावांना पुराचा धोका, आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा जाहीर



■ **उरण: दिगंबर जाधव**

पावसाळी काळात प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन आराखडा जाहीर केला असून तीन गावे दरडग्रस्त तर १५ गावांना अतिवृष्टीमुळे पुराचा धोका आहे. उरण तालुक्यात एकूण ६२ गावे आणि ३५ ग्रामपंचायती आहेत. पावसाळ्यात येणाऱ्या आपत्तीचे निराकरण करण्यासाठी उरणचे प्रशासन सज्ज झाले आहे. यासाठी नियंत्रण कक्षही तयार केला आहे. या कालावधीत नागरिकांनी संकटकाळी ९८९२५३८४०९ या भ्रमणध्वनीवर संपर्क करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. उरण तालुका हा तीन बाजूंनी समुद्राने वेढलेला असून आणि एका बाजूला डोंगर असल्यामुळे उरण तालुक्यात अतिवृष्टीत अनेक भागांत पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. उरण तहसील, उरण पोलीस ठाणे, स्थानिक स्वराज्य संस्था यांना देखील आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत. उरण तालुका हा समुद्र सपाटीपासून २१ फूट उंचीवर आहे. उरण शहर स्वत:च एका द्विपकल्पात वसलेले आहे. तालुक्याचे हवामान उष्ण व दमट असून तालुक्यातील सरासरी पर्जन्यमान २ हजार ९८३ मिलिमीटर आहे.

या गावांमध्ये काही ठिकाणी पूल, मोऱ्या बांधण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी नालेसफाई करण्यात आली आहे. सिडकोलादेखील या नालेसफाई आणि धारण तलावांमध्ये गाळ काढण्यास सांगितले आहे. तालुक्यातील नवघर, कुंडेगाव, पागोटे, बोकडवीरा, भेंडखळ, बांधपाडा, चिरनेर, जासई, पौडखार, बेलोंडाखार, चिर्ले, करळ, सोनारी, सावरखार आणि जसखार या १५ गावांना अतिवृष्टीत पुराचा धोका आहे. करंजा, मोरा, केगाव आणि नागाव या गावांना चक्रीवादळाचा सर्वाधिक धोका आहे. मोठ्या भरतीमुळे आवरे, कडापे, खोपटे, पाणजे या गावांना धोका संभवतो. पावसाळ्यात किंवा इतर वेळेस तालुक्यात कुठेही आपत्ती ओढवली तर अशा वेळेला कुणाशी संपर्क साधावा याची माहिती देखील या आराखड्यात देण्यात आली आहे.

उरण तालुक्यात कोणतीही नदी नसली तरी डोंगरावरून येणारे पाणी हे थेट खाड्यांना मिळते. त्यामुळे या खाड्या पावसाचे पाणी वाहून नेण्याचा स्रोत आहेत. मात्र मागील काही वर्षापासून या खाड्यांमध्ये भराव करून त्या अरुंद केल्यामुळे पाणी वाहून जाण्यात मोठा अडथळा होतो. परिणामी हे पाणी तुंबून आजूबाजूच्या गावांमध्ये शिरते त्यामुळे तेथे पूरपरिस्थिती निर्माण होते.

## मुदत संपूनही शहरात विकासकामे सुरूच, चौकांच्या अर्धवट कॉंक्रिटीकरणामुळे डांबरीकरणाची वेळ, पावसाळ्यात वाहन कोंडीची शक्यता

■ **नवी मुंबई: धनश्री सट्टा**

पावसाळा तोंडावर असतानाही अद्याप चौकांचे कॉंक्रिटीकरण व पामबीच मार्गावरील मायक्रोसर्फेसिंगची कामे सुरूच आहेत. चौकांच्या कॉंक्रिटीकरणाच्या अर्धवट कामामुळे त्या ठिकाणी डांबरीकरण केले जात आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यात त्या ठिकाणी खड्डे पडण्याची भीती व्यक्त करण्यात येत असून केला जात आहे. अर्धवट कामांमुळे पावसाळ्यात वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे.

विविध चौकांचे कॉंक्रिटीकरण तसेच पामबीच मार्गावर मायक्रोसर्फेसिंग, नालेदुरुस्ती, गटारे यांसह पालिकेच्या विविध इमारती यांची कामे सुरू आहेत. रस्ते दुरुस्ती, मल:निसारण वाहिन्या टाकण्यासाठीची खोदकामे



अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

नालेसफाईची कामे ९५ टक्के पूर्ण झाल्याचा दावा पालिका करत असताना शहरात विविध विकासकामांची शहरात अभियंता विभागाकडून मोठ्या प्रमाणात विकासकामे चालू असून जवळजवळ ७५० विकासकामे सुरु आहेत. त्यातील रस्ते व चौक कॉंक्रिटीकरणाची कामे अर्धवट आहेत. ज्या ठिकाणी कामे अर्धवट आहेत, त्या ठिकाणी कॉंक्रिटीकरण थांबवून डांबरीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे चौकातील अर्धवट कामांच्या ठिकाणी केल्या जाणाऱ्या कामांचा खर्च कोणाचा असा प्रश्न उपस्थित यासह विविध कामे केली जात असून ती तात्काळ थांबवणे आवश्यक आहे. पामबीच मार्गावर मायक्रोसर्फेसिंगची कामे करण्यात येत आहेत. पावसाळा सुरु होण्याची स्थिती असताना अद्याप खोदकामे सुरूच असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

इंडियम रोड कौन्सिलने देशभरात १५ मेनंतर डांबरीकरणाची कामे करू नयेत असा नियम केला असतानाही शासकीय आस्थापना तसेच नवी मुंबई महापालिका याकडे दुर्लक्ष करते. तसेच पालिकेच्या या प्रकाराला सजग नवी मुंबईकर विरोध करत असताना बिनधास्तपणे कामे सुरू आहेत.

## मुंबई महापालिकेडून ठाण्याच्या पाणी पुरवठ्यात दहा टक्के कपात, ठाण्यातील काही भागात पाणीटंचाईचे संकट

■ **ठाणे: तृप्ती गोरे**

मुंबई महापालिकेकडून ठाणे शहरात होणाऱ्या पाणी पुरवठ्यात दहा टक्के कपात लागू केली आहे. जलाशयांमधील पाणीसाठ्यात घट झाल्याने मुंबई महापालिकेने हा निर्णय घेतला आहे. यामुळे ठाण्यातील काही भागांमध्ये पाणी टंचाईची समस्या निर्माण होणार असल्याने येथील नागरिकांवर पाणी टंचाईचे संकट ओढावल्याचे चित्र आहे.

ठाणे शहरात चार स्त्रोतांमार्फत दररोज ५९० दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामध्ये महापालिकेच्या स्वत:च्या पाणीपुरवठा योजनेतून २५० दशलक्ष लीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्ष लीटर, स्टेम कंपनीकडून १२० दशलक्ष लीटर आणि मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. यामुळे



शहरातील पाणीपुरवठ्यासाठी हे स्त्रोत महत्वाचे मानले जातात. मुंबई महानगराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमधील पाणीसाठ्यात घट झाली आहे. हा जलसाठा अधिकाधिक काळ उपयोगात यावा, या उद्देशातून मुंबई महानगरपालिकेने काही दिवसांपूर्वी पाणी पुरवठ्यात ५ टक्के कपात लागू केली होती. या निर्णयामुळे मुंबई महापालिकेकडून ठाणे शहराला मिळणाऱ्या पाणी पुरवठात पाच टक्के कपात लागू झाली होती. त्यापाठोपाठ आता जलाशयांमधील पाणीसाठ्यात आणखी घट झाल्यामुळे मुंबई महापालिकेडून ठाणे शहराला होणाऱ्या पाणी पुरवठ्यात दहा टक्के कपात लागू केली आहे.

मुंबई महापालिकेकडून ठाणे शहराला ८५ दशलक्ष लीटर इतके पाणी दररोज मिळते. या पाण्याचा पुरवठा ठाणे शहरातील नौपाडा, पाचपाखाडी, हाजुरी, लुईसवाडी, रघुनाथ नगर, नामदेव वाडी, साईनाथ नगर, रामचंद्र नगर १, किसन नगर नं १, किसन नगर नं २ गांधी नगर, कोपरी कन्हैया नगर या परिसरात केला जातो.

## नितीन कंपनी पूलाखालील उद्यान आता कचराभूमी, चालण्यासाठी उद्यानात येणारे नागरिक हैराण

■ **ठाणे: गणेश बागडे**

पूर्व द्रुतगती महामार्गावरील नितीन कंपनी पुलाखाली बेकायदा वाहने उभी राहू नये. तसेच नागरिकांना चालणे, व्यायामासाठी जागा उपलब्ध व्हावी यासाठी सुमारे सात वर्षांपूर्वी ठाणे महापालिकेने नितीन कंपनी ते कॅडबरी जंक्शन पर्यंत उद्यान उभारले आहे. या उद्यानामुळे परिसरातील ज्येष्ठ नागरिक, क्रीडापटू येत असत. परंतु महापालिकेच्या दुर्लक्षामुळे आता हे उद्यान 'डम्पिंग'चा भाग झाल्याचे चित्र आहे. मार्गरोधक, बंद पडलेली सिग्नल यंत्रणा, कारवाई केलेले फलक अशा विविध वस्तू येथे साठविल्या जात आहे. भंगार वाहने, महापालिकेची वाहने देखील येथेच उभी असतात.



त्यामुळे एकेकाळी हिरवाईने नटलेला हा परिसर आता कचराभूमी ठरू लागल्याचे चित्र आहे. पूर्व द्रुतगती महामार्गावरील नितीन कंपनी ते कॅडबरी कंपनी उड्डाणपूलाखाली पूर्वी अनधिकृतरित्या शेकडो दुचाकी, कार, अवजड वाहने उभी करण्यात येत होती. तसेच या वाहनांच्या मागे गर्दुल्ले दारू किंवा अमली पदार्थांची नशा करत होते. त्यामुळे परिसराची रया निघून गेली होती. तसेच महिला सुरक्षेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला होता. हा प्रकार रोखण्यासाठी ठाणे महापालिकेने २०१७ मध्ये 'पीपीपी' तत्त्वावर या भागाचा विकास करण्यास सुरुवात केली होती. महापालिकेने या पूलाखाली सायकल ट्रॅक, चालण्यासाठी जॉगिंग ट्रॅक, लहान मुलांसाठी खेळण्याचे साहित्य, दोन्ही बाजूंनी रोपांची हिरवळ अशा सुविधा निर्माण केल्या होत्या. त्यामुळे या परिसराचा अक्षरश: कायापालट झाला होता.

पाचपाखाडी, नितीन कंपनी, कॅडबरी, खोपट भागात वास्तव्य करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना या ठिकाणी विरंगुळ्यासाठी हक्काची जागा उपलब्ध झाली होती. येथे जवळपास कुठेही उद्यान अथवा मोठी बाग नव्हती. त्यामुळे नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात होते.

## डोंबिवलीतील शिळफाटा रस्त्यावरील मेट्रोच्या रात्रभराच्या खोदाईने एमआयडीसीतील रहिवासी त्रस्त

■ **डोंबिवली : सतिश सोनावणे**

गेल्या महिन्यापासून कल्याण-तळोजा मेट्रो मार्गाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महावर्दळीच्या शिळफाटा रस्त्यावर सोनारपाडा, विको नाका ते डोंबिवली नागरी सहकारी बॅंकेपर्यंत सुरू केले आहे. या कामासाठी शिळफाटा रस्त्यावर रात्रीच्या वेळेत अवजड यंत्रणेने खोदकाम केले जात आहे. या कर्णकर्कश आवाजाने झोपमोड होत असल्याने एमआयसीडी परिसरातील रहिवासी, उद्योजक, व्यापारी त्रस्त आहेत. या खोदकामामुळे रात्रभर मातीचा उधळा उडतो. तो रात्रभर परिसरातील घरांमध्ये उडून घरे, परिसर खराब करत असल्याच्या तक्रारी एमआयडीसीतील रहिवाशांकडून केल्या जात आहेत. एमआयडीसी भागात बहुतांशी रहिवासी नोकरदार, व्यावसायिक आहेत. रात्रीची शांत झोप घेऊन पुन्हा सकाळीच नोकरदार वर्गाला उठावे लागते. लोकांची रात्रीची झोपायची वेळ झाली की शिळफाटा रस्त्यावर खोदकाम सुरू होऊन कर्णकर्कश आवाज येतात.

या आवाजाचा सर्वाधिक त्रास लहान बाळे, बिछान्याला खिळून असणारे वृध्द, ज्येष्ठ नागरिक, मनोरुग्ण यांना सर्वाधिक होत आहे. एमआयडीसीतील अनेक रहिवाशांनी शिळफाटा रस्त्यावर



खोदकाम करणाऱ्या ठेकेदाराची भेट घेऊन रात्रीच्या वेळेत कर्णकर्कश आवाज करत खोदकाम करू नका, अशी मागणी केली. ठेकेदाराने याविषयी रात्रीचे काम थांबवायचे असेल तर तुम्ही एमएमआरडीएच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटा, असे रहिवाशांना सांगितले. गेल्या तीन वर्षापूर्वी रस्तारूंदीकरण, सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता, दुभाजक अशा नियोजनात बांधणी करण्यात आलेल्या शिळफाटा रस्त्याची मेट्रो कामासाठी पुन्हा उखळण करण्यात आल्याने प्रवासी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत. या कामासाठी शिळफाटा रस्ता पुन्हा वाहनकोंडीत अडकू लागला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर 'मी करून दाखविले' हे लोकांना दाखविण्यासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी डोंबिवली शहराच्या प्रवेशव्दारावर हे काम सुरू केले असल्याची चर्चा आहे. कल्याण ग्रामीणचे आमदार प्रमोद उर्फ राजू पाटील यांनी या कामाविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शिळफाटा रस्त्याच्या दुभाजकामध्ये नारळी, शोभेची अनेक झाडे लावण्यात आली होती. ही सर्व झाडे मुळासकट उपटून टाकण्यात आली आहेत. याविषयी पर्यावरणप्रेमी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

## लग्न मोडल्याने तरुणीची आत्महत्या, ९ व्या मजल्यावरून उडी मारली

■ **भाईंदर: गणेश बागडे**

लग्न मोडल्याने निराश झालेल्या तरुणीने नव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना मिरा रोड मध्ये घडली आहे. नर्गिस मलिक (२०) असे मयत तरुणीचे नाव आहे. ती मिरा रोड येथीलअविंगा कॉम्प्लेक्समधील ९ व्या मजल्यावर रहात होती. नर्गिसचे पिंटू नामक तरुणाशी लग्न जमले



होते. दरम्यान, नर्गिसचे अन्य तरुणाशी प्रेमसंबंध असल्याची माहिती पिंटूला मिळाली. त्यामुळे त्याने नर्गिसशी वाद घातला आणि लग्न करू शकत नसल्याचे सांगितले. यामुळे नर्गिस मानसिक तणावात होती. तिच्या कुटुंबियांनी तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. मात्र रात्री साडे नऊच्या सुमारास किचनच्या खिडकीमधून तिने थेट खाली उडी मारली. तिला उपचारासाठी मिरा रोड येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली असल्याची माहिती काशिमिरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दिनकर पाटील यांनी दिली.

## फ्लेमिंगोच्या मृत्यूची हरित न्यायाधीकरणाकडून दखल; सिडकोसह वनविभाग, प्राधिकरणाला नोटीस

■ **नवी मुंबई: धनश्री सट्टा**

नवी मुंबईतील नेरुळ राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाच्या प्रधान खंडपीठाने येथील डीपीएस फ्लेमिंगो तलावाजवळ फ्लेमिंगोच्या मृत्यूची स्वत:हून दखल घेत राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाच्या (एनजीटी) प्रधान खंडपीठाने सिडको, राज्य वनविभाग आणि पाणथळ प्राधिकरण यांना नोटिसा बजावल्या आहेत.

नोटीसमध्ये पर्यावरणीय नियमांचे पालन करण्याशी संबंधित महत्त्वपूर्ण मुद्दे उपस्थित केले आहेत. विशेषत: वेटलॅंड (संवर्धन आणि व्यवस्थापन) नियम, २०१७ च्या तरतुदींचे पालन; जैविक विविधता कायदा, २००२ आणि पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ बाबत एनजीटीने टिप्पणी केली आहे.

एनजीटी अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव, न्यायमूर्ती अरुण कुमार त्यागी आणि तज्ज्ञ सदस्य डॉ. अफरोज अहमद यांच्या खंडपीठाने फ्लेमिंगोच्या मृत्यूचे प्रकरण पश्चिम विभागाकडे वर्ग केले आणि सुनावणीसाठी १८ जुलैची तारीख निश्चित केली आहे. एनजीटीने नमूद केले की, प्राथमिक निरीक्षणांवर आधारानुसार शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाने



(सिडको) नव्याने बांधलेल्या उंच रस्त्यांमुळे टी एस चाणक्य तलावातील तीनपैकी दोन तलावांत पाणी येण्याचे मार्ग बंद झाले होते. त्यामुळे तलावात पाणी साचले होते. फ्लेमिंगो सामान्यत: वाहते पाणी असलेल्या भागात राहतात हे तथ्य. फ्लेमिंगोच्या मृत्यूनंतर त्यांनी उपस्थित केलेल्या चिंतेला त्वरित प्रतिसाद दिल्याबद्दल पर्यावरणवाद्यांनी स्वागत केले आहे. नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी एन कुमार यांनी निदर्शनास आणून दिले की, सिडकोने नेरुळ येथील वाहतूक जेट्टीच्या अर्थात टर्मिनलच्या कामामुळे आंतरभरतीच्या पाण्याच्या प्रवाहावर परिणाम होणार नाही असे सिडकोने म्हटले असताना स्वत:च्या कामात नियमांचे उल्लंघन केले आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने दिलेल्या पर्यावरण मंजुरीमध्ये नमूद केलेल्या अटींचे हे उल्लंघन आहे. आणि पाण्याचा प्रवाह आणि जीवजंतू अबाधित आहे याची खात्री करण्यासाठी राज्याने दिलेल्या सरकारी आदेशाचेही उल्लंघन केले आहे.

फ्लेमिंगोच्या मृत्यूचे कारण ह्यप्रकाश प्रदूषणहण असू शकते, जे त्यांच्या नाजूक डोळ्यांमुळे पक्ष्यांची दृष्टी अंशत: बिघडवते. त्यात असे नमूद केले आहे की, पक्ष्यांना उडताना नवीन स्थापित एलईडी दिवे दिशाभूल करतात, असे एनजीटीने आदेशात नमूद केले आहे.

## अनधिकृत होर्डिंग्जमुळे कल्याण-डोंबिवली पालिकेचे २५४ कोटींच्या महसुलावर पाणी? शहरांच्या मुख्य रस्त्यांवर ९६ बेकायदा होर्डिंग्ज

■ **कल्याण: आकाश कांबळे**

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील मुख्य वर्दळीच्या रस्त्यांवर एकूण ९६ भव्य आकाराची बेकायदा होर्डिंग्ज आहेत. या होर्डिंग्जनी पालिका हद्दीतील सुमारे दोन लाख ८२ हजार ५५४ चौरस फुटाचे क्षेत्रफळ व्यापले आहे. या होर्डिंग्जचे पालिकेकडून आकारण्यात येणारे एक ते पाच वर्ष कालावधीतील शुल्क आणि त्यावरील दंडात्मक रकमेचा विचार करता या बेकायदा होर्डिंग्ज (जाहिरात फलक) लावणाऱ्या एजन्सींनी पालिकेचे मागील अनेक वर्षात सुमारे २५४ कोटी ३० लाखाचे नुकसान केले आहे. या सर्व प्रकाराला जबाबदार एजन्सी चालक, नियंत्रक पालिका अधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी या प्रकरणातील याचिकाकर्ते कौस्तुभ गोखले यांनी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांच्याकडे केली आहे.

ही रस्तोरस्ती लावण्यात



आलेली बेकायदा होर्डिंग्ज नैसर्गिक आपत्तीने कोसळुन सामान्यांचा जीव जातो. घाटकोपर येथील होर्डिंग्ज दुर्घटनेने हे स्पष्ट झाले आहे. कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत बेकायदा होर्डिंग्जने दुर्घटना घडल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा तत्पूर्वीच होर्डिंग्ज काढून टाकण्याची कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदार गोखले यांनी आयुक्तांकडे केली आहे. शिळफाटा रस्त्यावर अशाप्रकारची होर्डिंग्ज असल्याने एमएसआरडीसीने अशा होर्डिंग्जचा शोध कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. ९६ बेकायदा होर्डिंग्जनी कडोंमपा हद्दीतील दोन लाख ८२ हजार चौरस फूट जागा व्यापली आहे.

या जाहिरात फलकांचे प्रति वर्षाप्रमाणे चौरस फुटामागे २५ रुपये शुल्क धरल्यास ही रक्कम आठ कोटी ४७ लाख रूपये होते. पाच वर्षाचे हे शुल्क ४२ कोटी ३८ कोटी होते. हे जाहिरात फलक बेकायदा असल्याने त्यांच्या पाच पट दंड आकारण्याची महापालिका कायद्यात तरतूद आहे.

## डोंबिवलीतील अमुदान कंपनी स्फोटातून दोन मृतदेहांची ओळख बारा दिवसांनी पटली

■ **डोंबिवली: सतिश सोनावणे**

डोंबिवली एमआयडीसीतील सोनारपाडा येथील अमुदान कंपनी स्फोटात जळून खाक झालेल्या दोन मृतदेहांची ओळख बारा दिवसांनी पटली आहे. नातेवाईकांच्या डीएनए चाचणीवरून ही ओळख पटविण्यात आली आहे. विशाल पौडवाल (४०), मनीष दास (२२) अशी ओळख पटलेल्या कंपनी कामगारांची नावे आहेत. अमुदान कंपनीत स्फोट झाल्यानंतर ते मागील बारा दिवसांपासून बेपत्ता होते. या स्फोटातील मृतदेह पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत. या मृतदेहांचा कोळसा झाला असल्याने त्यांची ओळख पटविणे अवघड झाले आहे. समोर मृतदेह आहेत पण तो आपल्या नातेवाईकाचा आहे हे कसे समजायचे असे प्रश्न कुटुंबीयांना पडले आहेत. जोपर्यंत आपल्या मयत कामगाराची ओळख पटत नाहीत तोपर्यंत नातेवाईक पोलीस ठाण्यात, पालिका रुग्णालयात फेऱ्या मारत आहेत.

स्फोट झाल्यानंतर अनेक मृतदेहांची ओळख पटली नाही. पालिका रुग्णालयात ज्या नातेवाईकांचे



कामगार बेपत्ता आहेत. त्यांचे रक्ताचे नमुने घेऊन ते डीएनए चाचणीसाठी फोरेन्सिक प्रयोगशाळेत पाठविले होते. असे नुमने घेतलेल्या विशाल पौडवाल, मनीष दास यांचे त्यांच्या कुटुंबीयांबरोबरच्या रक्ताचे नमुने जुळले आहेत, अशी माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली. यासंदर्भातची माहिती कल्याण पोलिसांनी या दोन्ही कुटुंबीयांना देण्यात आली. पौडवाल, दास यांचे मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात अंत्यविधीसाठी देण्यात आले. पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ला यांनी डीएनए चाचणीवरून दोन मृतदेहांची ओळख पटली असल्याचे सांगितले. विशाल पौडवाल हे बदलापूर येथे पत्नी आणि आपल्या आठ वर्षांच्या मुलासह राहत होते. ते अमुदान कंपनी लगतच्या कॉसमॉस कंपनीत ग्राफिक डिझायनर म्हणून काम करत होते. मनीष दास हेही कॉसमॉस कंपनीत गेल्या महिन्यापासून कामाला होते. या स्फोटात रोहिणी कदम (२६), रिध्दी खानविलकर (३८), राकेश राजपूत (२७) हे मरण पावले होते. त्यांची ओळख यापूर्वीच पटविण्यात आली आहे. त्यामुळे अमुदान कंपनी स्फोटतील आतापर्यंत पाच मृतदेहांची ओळख पटविण्यात आली आहे. अद्याप सात मृतदेह शास्त्रीनगर रुग्णालयात ओळख पटत नसल्याने संरक्षित करून ठेवण्यात आले आहेत. ज्या कुटुंबीयांचे कामगार सदस्य बेपत्ता आहेत.

# रस्तेकामांच्या प्रक्रियेला वेग, महापालिका नव्या कामांची निविदा प्रक्रिया पावसाळयात पूर्ण करणार

**मुंबई: सम्यक कासारे**

लोकसभेची निवडणूक संपल्यानंतर आता मुंबई महानगरपालिकेच्या कामांना वेग येऊ लागला आहे. रस्त्यांच्या कामांसाठी मागवलेल्या निविदांना ज्या कंत्राटदारांनी प्रतिसाद दिला आहे त्यांच्याशी चर्चा करून लवकरच कार्यादेश दिले जाणार आहेत. पावसाळा तोंडावर आल्यामुळे आता रस्ते कॉंक्रीटीकरणाची कामे थांबवण्यात आली आहेत. मात्र नवीन कामांची निविदा प्रक्रिया या पावसाळ्याच्या काळात पूर्ण करण्यात येईल. गेल्यावर्षी जानेवारी महिन्यात दिलेल्या कंत्राटातील शहर भागातील कामे रखडल्यामुळे या कामांसाठी पुन्हा एकदा निविदा मागवण्यात आल्या होत्या. तर फेब्रुवारी महिन्यात पालिका प्रशासनाने मुंबईतील आणखी ४०० किमी लांबीच्या रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाच्या कामांसाठी निविदा मागवल्या होत्या. या दोन्ही निविदांसाठी एप्रिल महिन्यात निविदाकार पुढे आले होते. मात्र लोकसभेच्या निवडणूकीच्या आचारसंहितेमुळे पालिका प्रशासनाने कोणाला कंत्राट द्यायचे याबाबत निर्णय घेतला नव्हता. मात्र निवडणूक संपली असून निकालही लागले आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाने आता ही निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याचे ठरवले आहे. पावसाचे चार महिने काम सुरूच होऊ शकणार नसले तरी निविदाकारांशी चर्चा करून कंत्राटदार निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. प्रत्यक्षात ही कामे ऑक्टोबरमध्ये सुरू होऊ शकणार आहेत.

येत्या दोन वर्षात मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याचा संकल्प सोडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालिका प्रशासनाला सर्व रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करण्याचे निर्देश दिले होते. ६,०७८ कोटींच्या कामांसाठी




निविदा मागवण्यात आल्या होत्या. त्यातून पाच नामांकित कंत्राटदारांची निवड करण्यात आली व जानेवारी २०२३ मध्ये कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात आले. जानेवारी महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते रस्त्याच्या कामांचे भूमीपूजन करण्यात आले होते. ही रस्त्यांची कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. तर शहर भागातील रस्ते कंत्राटदाराने एकही काम सुरू न केल्यामुळे त्याचे कंत्राट रद्द करण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानंतर शहर भागासाठी नव्याने निविदा मागवल्या. ही निविदा प्रक्रिया सुरू असताना फेब्रुवारी महिन्यात पुन्हा एकदा संपूर्ण मुंबईतील ४०० किमीच्या कामांसाठी निविदा मागवण्यात आल्या होत्या. या निविदा प्रक्रियेला १५ कंत्राटदारांनी प्रतिसाद दिला आहे. शहरातील रस्त्यांसाठी दोन निविदाकार मुंबईतील शहर भागातील रस्त्यांच्या सिमेंट कॉंक्रीटीकरणाची कामे गेल्या वर्षभरापासून वादात सापडली आहेत. त्यानंतर या रखडलेल्या कामासाठी काढलेल्या पुनर्निविदाही न्यायालयीन कचाट्यात सापडल्या होत्या. त्यामुळे शहर भागातील कामांसाठी तिसऱ्यांदा मागवलेल्या निविदांना दोन निविदाकारांनी प्रतिसाद दिला आहे. त्यापैकी एनसीसी या संस्थेने कमी बोली लावली असून त्यांच्याशी चर्चा सुरू असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली. तर नव्या कामांसाठी आलेल्या कंत्राटदारांशीही वाटाघाटी पूर्ण करून लवकरच कार्यादेश दिले जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पावसाळयात कामे होणार नसली तरी वाहतूकीच्या परवानगी घेण्याचे काम पूर्ण केले जाईल, असेही ते म्हणाले.

आचारसंहितेचा पेच लोकसभेची निवडणूक पूर्ण झाली असून निकालही लागले आहेत. मात्र पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीची आचारसंहिता रस्त्यांच्या कामांसाठी लागू आहे का याबाबत आम्ही विचारणा करू व त्यानंतरच कार्यादेश दिले जातील, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली.

# पनवेल मार्गावरील वावर्ले या सर्वाधिक लांब बोगद्याचे खोदकाम पूर्ण, कर्जतसाठी पर्यायी रेल्वे मार्गिकेला गती

**मुंबई: विशाल पाटील**

पनवेल – कर्जत नवीन रेल्वे मार्गातील सर्वाधिक लांबीच्या वावर्ले बोगद्याचे खोदकाम पूर्ण झाले आहे. सध्या ठाणे – दिवादरम्यानचा पारसिक बोगदा मुंबई महानगरातील सर्वाधिक लांबीचा आहे. मुंबईतील वाहतुकीवर ताण आल्याने प्रवाशांना प्रवास करणे गैरसोयीचे झाले आहे. त्यामुळे मुंबईवरून कर्जतला जाण्यासाठी आणखी एक रेल्वे मार्ग तयार करण्याचे काम सुरू आहे. या मार्गावरून पनवेल येथून थेट लोकलने कर्जत गाठणे शक्य होणार आहे. तसेच कर्जत हे मुंबई-पुण्याला जोडणारे ठिकाण आहे. त्यामुळे कर्जतमध्ये लोकवस्ती वाढत आहे. त्यामुळे कर्जतवरून जलद गतीने लोकलने जाता यावे, यासाठी पनवेल – कर्जत दुहेरी रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. येत्या दोन वर्षात हार्बर



मार्गावरील सीएसएमटी स्थानकावरून पनवेलमार्गे थेट कर्जत गाठणे शक्य होणार आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या (एमआरव्हीसी) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ (एमयूटीपी-३) अंतर्गत पनवेल – कर्जत दुहेरी रेल्वेचे काम वेगात सुरू आहे. या रेल्वे मार्गात ३,१६४ मीटर लांबीचे नढाल, किरवली आणि वावर्ले असे तीन बोगदे आहेत. यापैकी नढाल येथील बोगद्याची लांबी २१९ मीटर आणि किरवली येथील बोगद्याची लांबी ३०० मीटर आहे. पनवेल-कर्जतदरम्यान सुमारे २९.६ किमी लांबीचा दुहेरी रेल्वे मार्ग तयार करण्यात येत आहे. या मार्गात दोन रेल्वे उड्डाणपूल, आठ मोठे पूल आणि ३६ लहान पूल उभारण्यात येणार आहेत. या मार्गिकेसाठी २,७८२ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. सध्या एकूण ५० टक्के कामे पूर्ण झाली असून डिसेंबर २०२५ पर्यंत दुहेरी मार्गाचे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य एमआरव्हीसीने ठेवले आहे.

# धनगर समाजाने भाजपची साथ सोडली?

**मुंबई: संजीनी खाडे**

**राज्यातील १२ लोकसभा मतदारसंघात निर्णायक मते असलेला धनगर समाज २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकांवेळी भाजप-शिवसेना युतीबरोबर होता. या लोकसभेला मात्र धनगर समाजाने महायुतीकडे पाठ फिरवत आपला रोष प्रकट केला आहे. परिणामी, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील १२ धनगरबहुल मतदारसंघात ११ ठिकाणी महायुतीला पराभवास सामोरे जावे लागले आहे.**

राज्यात धनगर समाजाच्या लोकसंख्येची टक्केवारी ९ टक्के मानली जाते. माढा, सोलापूर, सांगली, बारामती, परभणी, बीड, अहमदनगर, धाराशिव, कोल्हापूर आणि हातकणंकले या १२ लोकसभा मतदारसंघात व त्याअंतर्गत असलेल्या ७२ विधानसभा मतदारसंघात हा समाज २२ ते २९ टक्के आहे, असे महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंचने केलेले सर्वेक्षण सांगते. या सर्वेक्षणानुसार राज्यात धनगर समाजाचे मतदार १ कोटी ९ लाख असल्याचा दावा केला जातो. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत धनगरबहुल १२ मतदारसंघातील बारामती वगळता ११ जागा भाजप-शिवसेना युतीने जिंकल्या होत्या. यावेळी धनगरबहुल लोकसभा मतदारसंघात नेमके उलटे चित्र आहे. फक्त हातकणंगले वगळता सर्वच्या



सर्व ११ मतदारसंघात भाजपचा धुव्वा उडाला आहे. धनगर समाजाच्या विकासात शरद पवार यांनी आडकाठी घातली, धनगरांना आदिवासी आरक्षण न देता भटक्या जमाती (क) चे आरक्षण पवार यांनीच जाणूनबुजूण दिले, असे चित्र गेली काही वर्षे निर्माण केले होते. आश्चर्य म्हणजे धनगरबहुल मतदारसंघात यावेळी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्व चारही उमेदवार विजयी झाले आहेत. धनगर समाजाचे नेते व ‘रासप’ पक्षाचे प्रमुख असलेल्या महादेव जानकर यांना महायतीकडून परभणीतून उमेदवारी दिली होती. तसेच धनगर समाजाचे दुसरे नेते प्रकाश शेंडगे सांगलीतून अपक्ष उभे राहिले होते. मात्र या दोघा धनगर नेत्यांचा यावेळी मोठा पराभव झाला आहे.

# रस्त्यांच्या तक्रारींचे २४ तासांत निवारण करावे, अभिजीत बांगर यांचे आदेश

**मुंबई: सचिन कदम**

पावसाळ्यादरम्यान रस्त्यांवर खड्डे आढळल्यास ते बुजविण्याची कार्यवाही लवकरात – लवकर करता यावी, यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेतला असून नागरिकांना आता खड्डेविषयक तक्रार सुलभ पद्धतीने नोंदवता येणार आहे. पालिकेतर्फे खड्डे व गगराणी यांनी पूर्वीच दिले आहेत. तसेच रस्त्यांची सुरू असलेली कामे १० जूनपर्यंत पूर्ण करून वाहतूक योग्य स्थितीत आणण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. या सर्व कार्यवाहीचा बांगर सातत्याने आढावा घेत आहेत. नागरिक, लोकप्रतिनिधी, समाजमाध्यमाद्वारे सादर होणाऱ्या तक्रारींचा जलदगतीने



दुरूस्तीयोग्य रस्त्यांबाबत पारंपरिक पद्धतीने लेखी, तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून तक्रार नोंदवण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करण्यात आली आहे. दूरध्वनी, व्हॉट्सॲप, मोबाइल ॲप आदी समाजमाध्यमांद्वारे तक्रार करणे शक्य होणार आहे. तक्रार केल्यानंतर साधारणपणे २४ तासांच्या आत संबंधित अभियंत्यांनी तसेच, कंत्राटदाराद्वारे खड्डे बुजवावे, असे स्पष्ट आदेश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत. मुंबईतील नागरिकांची पावसाळ्यात गैरसोय होवू नये यासाठी खड्डेमुक्त रस्त्यांचे उद्दिष्ट ठेवून काम करावे, असे आदेश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण निपटारा व्हावा, यासाठी बांगर यांनी शुक्रवारी आढावा बैठक घेतली. यावेळी ते बोलत होते.

नागरिकांना दूरध्वनी, व्हॉटस‌ॲप आणि समाजमाध्यमांद्वारे खड्ड्यांची तक्रार नोंदविता येईल. या सर्व माध्यमातून प्राप्त होणाऱ्या तक्रारी २४ तासांत निकाली काढण्यात येतील. संबंधित तक्रार निकाली निघाली का, किती वेळात निकाली निघते, प्रलंबित असेल तर कधीपासून प्रलंबित आहे, निकाली निघालेल्या तक्रारींबाबत तक्रारदाराचा ‘फीडबॅक’ काय आहे, तक्रार निकाली निघाल्याबद्दल तक्रारदार समाधानी आहे का, हे पाहण्यासाठी इंटिग्रेटेड डॅशबोर्ड विकसित केला जात आहे, अशी माहिती बांगर यांनी दिली.

# फलकाची सदोष संरचना, ‘व्हीजेटीआय’चा अहवाल मुंबई महापालिका प्रशासनाला सादर

**मुंबई: विशाल पाटील**

कमकुवत पाया आणि सदोष संरचनेमुळे घाटकोपरमधील छेडानगर परिसरातील महाकाय फलक पडल्याचा अहवाल व्हीजेटीआय संस्थेच्या दोन तज्ज्ञांनी दिला आहे. मुंबईला वादळी वाऱ्याचा धोका असतो. मात्र वादळी वाऱ्यात टिकेल इतक्या क्षमतेची या जाहिरात फलकाची संरचनात्मक बांधणी नव्हती, असा अहवाल या दोन तज्ज्ञांनी नुकताच पालिका प्रशासनाला दिला आहे.

घाटकोपरच्या छेडानगर येथे १३ मे रोजी महाकाय जाहिरात फलक पडून १४ जणांचा मृत्यू झाला. भविष्यात असा प्रसंग घडू नये यासाठी या दुर्घटनेमागचे तांत्रिक कारण शोधण्यासाठी मुंबई महापालिका प्रशासनाने व्हीजेटीआय या संस्थेची मदत



घेतली होती. त्याकरिता पालिका प्रशासनाने संस्थेच्या संरचनात्मक अभियांत्रिकी (स्ट्रक्चरल इंजिनीअरिंग) विभागाच्या प्रमुखांना पत्र लिहिले होते. या दुर्घटनेमागचे तांत्रिक कारण शोधण्याच्या दृष्टीने हा अभ्यास करण्याची विनंती पत्रात करण्यात आली होती. संरचनात्मक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख केशव सांगळे आणि डॉ. अभय बांबोले यांनी या दुर्घटनेतील तांत्रिक कारणांचा अभ्यास करून नुकताच आपला अहवाल सादर केला आहे.

केवळ प्रति तास ४९ किमी एवढ्या वाऱ्याचा वेग सहन करेल एवढीच या जाहिरात फलकाची क्षमता होती. मात्र १३ मे रोजी प्रति तास ८७ किमी एवढ्या वेगाने वारे वाहत होते. या वाऱ्यामुळे हा फलक उभा राहू शकला नाही, असा निष्कर्ष या अहवालात काढण्यात आला आहे. मुंबई शहर सागरी किनारपट्टीच्या जवळ असल्यामुळे प्रति तास १५८ किमी एवढ्या वादळी वाऱ्यात उभे राहू शकेल अशाच पद्धतीने फलकांची संरचना असायला हवी, असेही या अहवालात म्हटले आहे. मात्र घाटकोपरचा जाहिरात फलक हा मजबूत नव्हता. दोषपूर्ण संरचनेमुळे हा फलक पडल्याचे या अहवालात म्हटले आहे.

# वडाळयात खारफुटीच्या कत्तलीप्रकरणी दोघांविरोधात गुन्हा

**मुंबई: प्रथमेश चव्हाण**

वडाळा येथे खारफुटीची कत्तल करून त्यावर झोपड्या उभारल्याप्रकरणी वडाळा पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने याप्रकरणी तक्रार केली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रताप जगताप (५१) यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी वडाळा पोलिसांनी मुरलीलाल गरोडिया व भायराम ढल्ला यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार वडाळा येथील माहुल रोड नाल्याजवळील सीएस क्रमांक १४४ व १४५ येथे हा प्रकार घडला. आरोपींनी या ठिकाणी खारफुटीवर भराव टाकून रस्ता बनावला. तसेच



त्या ठिकाणी कामगारांसाठी झोपड्या बांधल्या, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच त्या ठिकाणी मुरूम मातीचा बांध टाकून पाणीही अडवण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी वडाळा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# गोरेगाव - मुलुंड जोडरस्ता प्रकल्पाआड येणारी बांधकामे हटवली, प्रकल्पाच्या कामाला वेग

**मुंबई: रघुवीर जाधव**

गोरेगाव – मुलुंड जोडरस्ता प्रकल्पाआड येणारी मालाडमधील ५१ बांधकामे पालिकेच्या पी उत्तर विभागाने शुक्रवारी कारवाई करून हटवली. त्यामुळे या प्रकल्पाला वेग येणार आहे. तसेच मालाडमधील वाहतूक समस्या सोडवण्यासही मदत होणार आहे.



पूर्व आणि पश्चिम उपनगरांना जोडणारा गोरेगाव मुलुंड जोडरस्ता मुंबई महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक आहे. सुमारे १२.२ किमी लांबीचा हा मार्ग चार ते पाच विभागातून जातो. या मार्गावर अनेक ठिकाणी बांधकामे, अनधिकृत बांधकामे असल्यामुळे ती टप्प्याटप्प्याने हटविण्यात येत आहेत. याच कारवाईचा भाग म्हणून शुक्रवारी गोरेगांव – मुलुंड जोडरस्ता रुंदीकरणात बाधित होत असलेली एकूण ५१ बांधकामे पी उत्तर विभागाने हटवली. या ५१ बांधकामांमध्ये सात निवासी व ४४ अनिवासी बांधकामांचा समावेश होता. परिमंडळ ४चे उपायुक्त विश्वास शंकरवार, पी/ उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त किरण दिघावकर यांनी ही कारवाई पार पाडली. दोन जेसीबी सयंत्र, ३० कामगार आणि सात अभियंते यांच्या मदतीने ही बांधकामे निष्कासित करण्यात आली. दरम्यान, मालाडमधील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी मुंबई महानगरपालिकेच्या पी / उत्तर विभाग कार्यालयाच्या वतीने एका पाठोपाठ एक रस्ता रुंदीकरणाची कामे हाती घेतली आहेत. याचाच एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली.

# ‘घाटकोपर – अंधेरी – वर्सोवा मेट्रो १’ला दहा वर्षे पूर्ण, आतापर्यंत ९७ कोटी प्रवाशांनी केला प्रवास

**मुंबई: सम्यक कासारे**

मुंबईतील पहिली मेट्रो मार्गिका अशी ओळख असलेल्या ‘घाटकोपर – अंधेरी – वर्सोवा मेट्रो १’ मार्गिकेला सेवेत दाखल होऊन शनिवारी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या दहा वर्षात ‘मेट्रो १’ मार्गिकेला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या दहा वर्षात या मार्गिकेवरून तब्बल ९७ कोटी मुंबईकरांनी प्रवास केला आहे.

मुंबईत मजबूत आणि अत्याधुनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ३३७ किमी लांबीचा मेट्रो प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पातील पहिली मार्गिका म्हणजे ‘घाटकोपर – अंधेरी – वर्सोवा मेट्रो १’. मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडने (एमएमओपीएल) अर्थात



रिलायन्स इन्फ्राच्या माध्यमातून खासगी – सार्वजनिक सहभागातून या मार्गिकेची उभारणी करण्यात आली. या मार्गिकेच्या संचलन आणि देखभालीची जबाबदारी एमएमओपीएलवर आहे. ही मार्गिका ८ जून २०१४ रोजी सेवेत दाखल झाली. मुंबईकरांचे मेट्रो प्रवासाचे स्वप्न या मार्गिकेमुळे पूर्ण झाले. या मार्गिकेला प्रवाशांची पसंती मिळत आहे. त्यामुळेच दहा वर्षात ९७ कोटी प्रवाशांनी या मार्गिकेवरून प्रवास केला आहे. दिवसाला या मार्गिकेवरून ४.५ लाख प्रवासी प्रवास करतात.

मेट्रो १ मार्गिकेवरून दिवसाला मेट्रो गाड्याचा ४१८ फेऱ्या होतात. या मार्गिकेवर १६ मेट्रो गाड्या धावत असून आतापर्यंत या गाड्यांनी १२.६ कोटी किमी प्रवास केला आहे. दरम्यान, या मार्गिकेवरील प्रवासी संख्या वाढावी यासाठी अनेक बदल, उपाययोजना एमएमओपीएलने केल्या आहेत.

# ईडीने जप्त केलेली १८० कोटींची मालमत्ता प्रफुल्ल पटेलांना परत मिळणार; ‘वॉशिंग मशीनची कमाल’, राऊतांचा आरोप

**मुंबई: विशाल कारंडे**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार गटाचे नेते आणि राज्यसभा खासदार प्रफुल पटेल यांना मुंबईतील अपील न्यायाधिकरणाने मोठा दिलासा दिला आहे. ईडीने काही काळापूर्वी प्रफुल पटेल यांची १८० कोटींची मालमत्ता जप्त केली होती, ही कारवाई अवैध असल्याचे न्यायाधिकरणाने म्हटले आहे. प्रफुल्ल पटेल यांच्याशी संबंधित वरळीतील सीजे हाऊस इमारतीतील चार मजल्यांवर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) टाच आणली होती. दाऊद इब्राहिमचा विश्वासू इक्बाल मिर्ची कुटुंबियांशी या जागेचा व्यवहार करण्यात आल्याचा आरोप आहे. याबाबत ‘ईडी’कडून तपास सुरू होता. वरळीतील सीजे हाऊस या इमारतीमध्ये प्रफुल पटेल यांच्या मालकीचे चार मजले आहेत. ज्याची किंमत १८० कोटी असून प्रफुल पटेल आणि त्यांच्या कुटुंबियांच्या नावे ही मालमत्ता आहे. प्रफुल पटेल, त्यांच्या पत्नी वर्षा आणि मिलेनियम डेव्हलपर या कंपनीच्या मालकीची घरे या इमारतीमध्ये आहेत.

दाऊद इब्राहिमचा सहकारी आणि अमली पदार्थाचा माफिया इक्बाल मिर्चीची पहिली पत्नी हजरा मेमनकडून सदर मालमत्ता विकत घेतली आहे, असा आरोप ईडीने लावला होता. इकबाल मिर्ची ऊर्फ इकबाल मेमन हा १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट मालिकेतील आरोपी आहे. २०१३ मध्ये त्याचा लंडन येथे मृत्यू झाला. ही जागा वरळीमधील नेहरू तारांगणाच्या जवळ आहे. याच ठिकाणी मिलेनियम डेव्हलपर्सने १५ मजली इमारत उभी केली आहे. त्याचे नाव सीजे हाऊस असे आहे.



मुंबईतील न्यायाधिकरणाने ईडीने केलेला दावा फेटाळून लावला. प्रफुल पटेल यांची मालमत्ता मनी लॉंडरिंग प्रकारात मोडत नसून त्याचा मिर्चीशी काहीही संबंध नाही, असेही नमूद केले आहे. अपील न्यायाधिकरणाने पुढे म्हटले की, सीजे हाऊसमधील मेमन आणि त्याच्या दोन मुलांशी संबंधित असलेली १४ हजार चौरस फूटाची मालमत्ता ईडीने जप्त केली आहे. त्यामुळे प्रफुल पटेल यांची मालमत्ता जप्त करण्याचा विषयच नाही, कारण ते या गुन्ह्याशी संबंधित नाहीत.

प्रफुल पटेल यांनी अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादीतून बाहेर पडून स्वतःचा वेगळा गट केला, तेव्हाच शरद पवार गटाने त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचा आणि गुन्ह्यांचा उल्लेख केला होता. भाजपा ही वॉशिंग मशीन असून आपल्यावरील डाग धुवून काढण्यासाठी भ्रष्ट नेते तिथे जातात, असे सांगितले गेले होते. अपील न्यायाधिकरणाने आता दिलेल्या निकालावरून विरोधक पुन्हा एकदा आरोप करण्याची शक्यता आहे.

या निकालानंतर शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले की, अशा प्रकरणांमुळेच ईडीची विश्वासार्हता उरलेली नाही. त्यांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित करण्यास जागा आहेत. यावरून ईडी, केंद्रीय तपास यंत्रणा आणि सीबीआय या यंत्रणा भाजपाचेच विस्तारीत रुप आहे, हे सिद्ध होते.

# पालिका आयुक्तांनी बोलावल्यानंतरही बैठकीला गैरहजर राहणे अधिकाऱ्याला महाग पडले; अनधिकृत बांधकामांना अभय देणे भोवले

■ मुंबई: माधव अलवा

वर्सोवा येथील अनधिकृत बांधकामांचा मुद्दा पालिकेच्या वर्तुळात चांगलाच गाजला असून एका अभियंत्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. वर्सोवा येथे सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन परिसरामध्ये अनधिकृत बांधकामांकडे कानाडोळा करणे, वरिष्ठांनी वारंवार सूचना करूनही अनधिकृत बांधकामे न पाडणे, बैठकांना हजर न राहणे, कार्यालयात न येणे अशा अनेक तक्रारींमुळे के पश्चिम विभागातील दुय्यम अभियंता सोमेश शिंदे यांना निलंबित करण्यात आले आहे. तर, पदनिर्देशित अधिकारी स्वाप्नील कोळेकर यांचीही बदली करण्यात आली आहे. महानगरपालिका आयुक्तांच्या समक्ष बैठकीस उपस्थित राहण्याची सूचना दिल्यानंतरही शिंदे गैरहजर राहिल्यामुळे त्यांना 'कारणे दाखवा' नोटीसही बजावण्यात आली आहे.

अंधेरी, जोगेश्वरी पश्चिमचा समावेश असलेल्या के पश्चिम विभागात २०२२ पासून कार्यरत असलेले दुय्यम अभियंता सोमेश शिंदे यांच्याकडे प्रभाग क्रमांक ५९, ६० आणि ६३ यांचा कार्यभार सोपवण्यात आला होता. प्रभाग क्रमांक ५९ आणि ६३ मध्ये अनधिकृत बांधकामे, मोठ्या प्रमाणात अनधिकृत फेरफार, मोकळ्या जमिनीवरील बांधकामे, विशेषतः वेसावे येथे सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन परिसरात व दलदलीच्या जमिनीवर अनाधिकृत बांधकामांविषयी प्रशासनाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत होत्या. सहआयुक्त विश्वास शंकरवार आणि के पश्चिम विभागाचे सहायक आयुक्त डॉ. पृथ्वीराज चौहान यांनी या सर्व तक्रारींची दखल घेऊन त्यावर कारवाई करण्यासाठी सोमेश शिंदे यांना वारंवार सूचना केल्या होत्या. सोमेश यांना प्रत्यक्ष बोलावून संबंधित ठिकाणी पाहणी करून कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र शिंदे यांनी या सगळ्या निर्देशांकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे.



गेल्या आठवड्यात ३१ मेपासून वर्सोवा परिसरात अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात येणार होती. त्यात शिंदे यांनी कुचराई केल्याचे आढळून आले होते.

त्यामुळे ५ जून रोजी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी हे पाहणी दौऱ्यावर असताना त्यांनी सोमेश शिंदे आणि पदनिर्देशित अधिकारी स्वप्निल कोळेकर यांना के पूर्व विभाग कार्यालयात बैठकीसाठी बोलावले होते. मात्र सोमेश शिंदे या बैठकीस गैरहजर राहिले आणि महानगरपालिका आयुक्तांच्या निर्देशांचे त्यांनी उल्लंघन केले. त्यामुळे या प्रकरणाला एकूणच गंभीर वळण आले असून शिंदे यांच्यावर प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली आहे. दरम्यान, वेसावे येथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी महानगरपालिका आयुक्तांच्या मंजुरीने विशेष पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. वर्सोवा येथील अनधिकृत बांधकामे पाडण्याचे निर्देश पालिका प्रशासनाने के पश्चिम विभागाला दिले होते. ३ जून २०२४ रोजी कारवाई नियोजित होती. त्याबाबत निर्देश मिळाल्यानंतरही सोमेश शिंदे यांनी कारवाईसाठी कोणतीही तयारी केली नाही. एवढेच नव्हे तर ३ आणि ४ जून २०२४ रोजी प्रत्यक्ष निष्कासन कारवाई सुरू असताना सोमेश शिंदे यांनी निष्क्रियता दाखवली. सहआयुक्त, सहाय्यक आयुक्त व इतर सहकारी प्रत्यक्ष घटनास्थळी भर उन्हात उभे राहून दिवसभर कारवाई करीत असताना सोमेश शिंदे खासगी वाहनात वातानुकुलन यंत्रणा सुरू करून चक्क बसून राहिले. कारवाई पूर्ण होण्याआधीच ते निघून गेले. ही निष्कासन कारवाई रात्री उशिरापर्यंत सुरू होती व तोवर वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी उपस्थित होते.

सोमेश शिंदे यांच्याबाबत अनेक प्रकारच्या तक्रारी आतापर्यंत पुढे आल्या आहेत. अनधिकृत गैरहजेरी, कार्यालयात अनुपस्थिती, इतर कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी नोंदवणे, बाहेर खासगी कार्यालय थाटल्याच्या तक्रारी, महानगरपालिका कार्यालयात नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही न करणे आणि एकूणच प्रशासकीय कामकाजात हेळसांड इत्यादी वेगवेगळ्या कारणांनी सोमेश शिंदे यांची चौकशी सुरू आहे.

# रुंदीकरण केलेल्या ठाण्यातील रेल्वे फलाटावर पावसाच्या पाण्याचे तळे, लोकलमध्ये चढताना प्रवाशांची कसरत

■ मुंबई: राकेश गायकवाड

६२ तासांचा मेगाब्लॉक घेऊन ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाच आणि सहाचे रुंदीकरण करण्यात आले. कमी कालावधीत केलेल्या या कामांचा सर्वस्तरातून गौरव झाला. आता पाऊस पडल्यावर या रुंदीकरण केलेल्या फलाटावर पावसाच्या पाण्याचे तळे साचते. या तळ्यातून लोकलमध्ये चढताना विशेषता महिलांना मोठी कसरत करावी लागत आहे, अशा तक्रारी प्रवाशांनी केल्या आहेत. ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाचवर केलेल्या रूंदीकरणाचे काम सिमेंट काँक्रीटचे आहे. हे काम मजबूत होण्यासाठी त्याच्यावर घायपताच्या गोण्या टाकण्यात आल्या आहेत. या गोण्यांवर सकाळ, संध्याकाळ ठेकेदार पाणी मारतो. त्यामुळे सिमेंटमधील ओलावा कायम राहून हे काम मजबूत होईल. परंतु, या गोण्या ओल्या असल्यामुळे फलाटावर लोकल आली की या ओल्या गोण्या प्रवाशांच्या पायात अडकतात, अनेक प्रवाशांच्या चपला या गोण्यांमध्ये अडकत असल्याने ते पाय घसरून फलाटावर पडत आहेत. गुरुवारी सकाळी दहा वाजताच्या दरम्यान ठाणे रेल्वे स्थानक परिसरात पाऊस



पडला. यावेळी रुंदीकरण केलेल्या फलाटावर छप्पर नसल्याने आणि पावसाचे पाणी थेट फलाटावर पडल्याने या फलाटावर पाण्याचे तळे साचले होते. बहुतांशी प्रवाशांचे बूट चामड्याचे असतात. त्यांना या पाण्यातून जाताना काळजी घ्यावी लागत होती. फलाटावरील साचलेले पाणी बाहेर जाण्यासाठी वाट नसल्याने ते फलाटावर तुंबून होते. लोकल आली की प्रवासी या पाण्यातून उड्या मारत जात असल्याने आजुबाजुच्या प्रवाशांच्या कपड्यांवर हे पाणी उडत आहे. अनेक प्रवासी या पाण्यात पाय घसरून पडत होते. या नवीन कामाचा हा नवीन ताप पाहून प्रवासी संतप्त होत होते. त्यामुळे फलाट क्रमांक पाचवर मुसळधार पाऊस सुरू होण्यापूर्वी छप्पर बसविण्याचे आणि फलाटावर पावसामुळे तुंबणारे पाणी वाहून जाईल यासाठी व्यवस्था करावी, अशी मागणी प्रवासी करत आहेत.

ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक पाच, सहा रूंदीकरणाचे काम रेल्वेने गतीने केले. या कामामुळे या फलाटावर होणाऱ्या गर्दीचे विभाजन झाले आहे. या रूंदीकरण केलेल्या फलाटावर छप्पर नाही. त्यामुळे पावसाचे पाणी थेट फलाटावर पडून तळे साचत आहे. तसेच या ठिकाणी काँक्रिट मजबुतसाठी गोणपाटे टाकली आहेत. ती प्रवाशांच्या पायात अडकत आहेत.

# तरुणाई आणि नवीन व्यसने

व्यसनशील पदार्थांचा वापर शतकानुशतके प्रचलित आहे, परंतु हल्ली नवनवीन व्यसने निर्माण होत आहेत. पहिला वापर, सवय, अवलंबित्व आणि व्यसन आणि नंतर या चढत्या पायऱ्यांनी तरुण-तरुणी फक्त अधोगतीच्या मार्गावर जातात. या व्यसनांना दूर करण्यासाठी सक्रिय पावले उचलणे अत्यावश्यक आहे. 'व्यसन' हा शब्द आरोग्यास हानी पोहोचविणाऱ्या अत्याधिक वर्तनांच्या पलीकडे विकसित झाला आहे. यात आता अशा वर्तनांचा समावेश आहे, जे काहींसाठी सामान्य असू शकतात; परंतु इतरांसाठी नाही. पारंपरिकपणे व्यसनामुळे तंबाखू आणि अल्कोहोल सारख्या पदार्थांची आठवण येते. मात्र संपूर्ण नवीन क्षेत्र उदयास आले आहे. हे आपल्याला नवीन व्यसनांच्या विषयावर आणते. वेपिंग, हुक्का आणि अजून काही, ज्यात काहीही मिसळून हुंगले जाऊ शकतात अशा पदार्थांचे सेवन. तरुण पिढीचे हे नवे आकर्षण बनत आहे. तथापि, या वर्तनांचे सामान्यीकरण आणि व्यापक अवलंब, विशेषतः १८ वर्षांखालील मुलांमध्ये, गंभीर चिंता वाढवत आहेत.



पालक उज्ज्वल भविष्याच्या आशेने पाल्याच्या शिक्षणात गुंतवणूक करतात. अनेक किशोरवयीन मुले तणाव, साथीदारांचा दबाव किंवा समाधान शोधण्याच्या विविध कारणांमुळे धोकादायक व्यसनांच्या जाळ्यात अडकतात. याचा वेग चिंताजनक आहे. त्याचा केवळ व्यक्तींनाच नाही तर संपूर्ण समाजासाठी धोका निर्माण होतो. अक्षरशः वाटेल ते व्यसनशील पदार्थ बाजारात उपलब्ध आहेत. ते कोठे मिळतात, हे महाविद्यालयीन आणि काही शालेय विद्यार्थ्यांनाही माहीत असतात. फक्त पालकांनाच माहीत नसते की, आपली मुले कुठल्या मार्गाने जात आहेत.

डिजिटल प्लॅटफॉर्म आणि ॲप्सच्या उदयाने, विशेषतः इन्स्टाग्राम, फेसबुक आणि ट्विटर सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मने व्यसनांचा नवीन संच समोर आणला आहे. हे प्लॅटफॉर्म एकेकाळी त्यांच्या कनेक्टिव्हिटीसाठी ओळखले जात. आता उदासीनता आणि सामाजिक तुलनेची भावना, विशेषतः तरुणांमध्ये याची भयावह लागण होत आहे. दुसरीकडे स्वतःला खोलीत कोंडून घेऊन (पूर्वी सायबरकॅफेत बसून) पबजीसारखे खेळ खेळणाऱ्यांची संख्या कोट्यवधींच्या घरात पोहोचली आहे. शिवाय, 'डेटिंग ॲप्स आणि बेटिंग प्लॅटफॉर्म' सारख्या व्यसनाधीन ॲप्स समस्या वाढवत आहेत. देश अर्थपूर्णतेच्या मार्गावर असताना माहिती तंत्रज्ञानाच्या वापराने नको त्या गोष्टींचे स्वतःवर प्रयोग करून आर्थिक व शारीरिक नुकसान होऊ शकते. याचे दूरगामी सामाजिक परिणाम आहेत. वैयक्तिक स्तरावर सुरुवात करून या व्यसनांना दूर करण्यासाठी सक्रिय पावले उचलणे अत्यावश्यक आहे.

स्वतःला आणि मित्र-मैत्रिणींना या सापळ्यांचा प्रतिकार करण्यासाठी आणि स्वविकासाला प्राधान्य देण्यासाठी सक्षम केले पाहिजे. जागरूकता वाढवून, खुल्या चर्चेला चालना आणि आरोग्यदायी पर्यायांना प्रोत्साहन देऊन आधुनिक व्यसनांचा विध्वंसक प्रभाव कमी करू शकतो.

# लोकशाही बळकटीची 'पंचायतराज' व्यवस्था

**भारतात लोकशाही आहे याचा पहिला अनुभव अथवा संबंध नागरिकांना कुठे येत असेल, तर तो ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद पातळीवर. नागरिकांचा संबंध स्थानिक स्वराज्य संस्थांशीच बहुतांश वेळा येतो. सर्वसामान्य नागरिकाचे थेट देशाच्या संसदेत काम असण्याचे काहीच कारण नसते.**

भारतात पंचायतराज व्यवस्थेला मोठा इतिहास आहे. 'भारत हा छोट्याछोट्या खेड्यांचा समूह असावा' अशी कल्पना महात्मा गांधी यांनी केली होती. अर्थात घटनाकारांना ती जशीच्या तशी मान्य नव्हती.

स्वातंत्र्यानंतर आणि राज्यघटनेच्या अंमलबजावणीनंतरही बराच काळ राज्यांच्या पातळीवर पंचायतराज व्यवस्थेची तरतूद असली, तरी थेट राज्यघटनेत पंचायतराज व्यवस्थेच्या सविस्तर तरतुदी नव्हत्या. केवळ राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांत त्यासंबंधी उल्लेख असणारी तरतुदी अस्तित्वात होती.

पंचायतराज व्यवस्थेच्या सविस्तर तरतुदी ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे देशाच्या राज्यघटनेत करण्यात आल्या असल्या, तरी त्यापूर्वी देशात राज्यांच्या कायद्याद्वारे राज्यपातळींवर स्वतंत्र पंचायत व्यवस्था अंमलात होत्या.

राजस्थान हे पंचायतराज व्यवस्था निर्माण करणारे देशातील पहिले राज्य आहे. १९९२ च्या घटनादुरुस्तीच्या पूर्वी बळवंतराय मेहता समिती, अशोक मेहता समिती, विठ्ठलराव गाडगीळ समिती आदी समित्यांनी पंचायतराज व्यवस्थेची देश पातळीसाठी वेगवेगळी प्रारूपे सुचवली होती.

तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांच्या काळात ७३ वी घटनादुरुस्ती झाली असली, तरी पंचायतराज व्यवस्थेचे श्रेय मात्र राजीव गांधी यांनाच दिले जाते. राजीव गांधी यांनी पंतप्रधान असताना पहिल्यांदा लोकसभेतमध्ये पंचायतराज व्यवस्थेचे घटनादुरुस्ती विधेयक मंजूर झाले होते. मात्र, ते राज्यसभेत संमत होऊ शकले नाही. त्यानतंर व्ही. पी. सिंह पंतप्रधानपदावर असतानाही हे विधेयक प्रस्तावित होते. मात्र, हे सरकार कोसळल्याने ते विधेयक व्यपगत झाले.




ग्रामीण भागांत ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद अशी तीनस्तरीय पंचायतराज व्यवस्था निर्माण करण्यात आली. या व्यवस्थेमध्ये लोकांद्वारे प्रतिनिधी निवडून देणे सक्तीचे करण्यात आले.

या व्यवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे ही घटनात्मक व्यवस्था असल्याने यापुढील काळात पंचायतींच्या निवडणुका घ्याव्यात अथवा नाहीत हे राज्य शासनाच्या मर्जीवर अवलंबून राहिलेले नाही. या व्यवस्थेत महिला, अनुसूचित जाती व जनजाती आणि इतर मागासवर्ग यांना आरक्षण सक्तीचे आहे. ग्रामसभा घेणे घटनेने सक्तीचे केले असून, गावाच्या संदर्भातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार ग्रामसभेला आहेत.

राज्यघटनेत ७३ व्या घटनादुरुस्तीच्या अन्वये ११ वे परिशिष्ट नव्याने समाविष्ट करून, त्यामध्ये पंचायतींनी पार पाडायची २९ कामे समाविष्ट केली आहेत. याच घटनादुरुस्तीने कायद्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्यपातळीवरील निवडणूक आयोग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीवाटपासाठी वित्त आयोगाची निर्मिती केली आहे.

या घटनादुरुस्ती विधेयकाचे दोन भाग करण्यात आलेले असून, काही बाबतींत- उदाहरणार्थ, ग्रामसभा, मतदानासाठीचे वय, पंचायतीचा कालावधी, राज्य निवडणूक आयोगाची स्थापना याबाबतीत घटनेद्वारे सक्तीच्या तरतुदी केल्या आहेत.

मात्र, काही बाबतींत- उदाहरणार्थ, ग्रामसभांचे अधिकार, निवडणूक घेण्याच्या पद्धती, आरक्षणाच्या अंमलबजावणीची पद्धत इत्यादी बाबतीत स्वतंत्रपणे कायदा करून निर्णय घेण्याचे अधिकार राज्यांना देण्यात आलेले आहेत.

ग्रामीण भागात पंचायतराज व्यवस्थेने क्रांतिकारी बदल घडविले आहेत. या व्यवस्थेने सर्वसामान्यांना राज्यकर्ता होण्याची संधी उपलब्ध करून दिली. भारतीय लोकशाही बळकट करण्यात या पंचायत व्यवस्थेचे मोठे योगदान आहे. पंचायती राज्य व्यवस्था ग्रामीण भागासाठी असली, तरी देशातील आदिवासी भागासाठी ती सक्तीची नाही.

आदिवासी भागांसाठी याबाबतीत स्वतंत्र 'पेसा' कायद्याची तरतूद आहे. याद्वारे आदिवासी भागातील ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणावर अधिकार देण्यात आले असून, या पंचायतींच्या प्रमुखपदी आदिवासी व्यक्तीच असणे सक्तीचे आहे; तसेच या ग्रामपंचायतींच्या भागांत कोणताही प्रकल्प राबवण्यासाठी अथवा जमीन अधिग्रहणासाठी संबंधित ग्रामसभेची परवानगी सक्तीची आहे.

देशातील आदिवासींच्या स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचे जतन आणि संवर्धन व्हावे आणि आदिवासींच्या जीवनावर आणि जीवनशैलीवर इतर कोणाचेही आक्रमण होऊन नये म्हणून या स्वतंत्र कायद्याची निर्मिती करण्यात आलेली आहे.

# कपडे धुणाऱ्या वॉशिंग मशिनचा इतिहास

आज धुळीने माखलेले कपडे धुणं हे जिकिरीचं, कष्टाचं काम राहिलेलं नाही. फक्त धुवायचे कपडे एकत्र करायचे, वॉशिंग मशीन नामक यंत्रामध्ये टाकून द्यायचे आणि काही बटनं दाबायची की ते कपडे स्वच्छ होऊन 'रेडी टु ड्राय' या स्वरूपात आपल्यासमोर येतात. पण हे सगळीकडेच घडत नाही. आजही खेडोपाडी अनेक ठिकाणी नदीकिनारी जाऊन कपडे धुणं हीच पद्धत रूढ आहे. वॉशिंग मशीन येण्याच्या आधीच्या काळात हाताने कपडे धुणं हेच प्रचलित होतं.

**पूर्वी कपडे कसे धुतले जायचे?**

अतिप्राचीन काळी नुसत्या पाण्याने कपडे धुतले जायचे. यामध्ये केवळ कपडे साध्या पाण्यात भिजवणं, खळबळणं, धोपटणं या गोष्टी केल्या जात. धोबीघाट हे बहुधा नदीकिनारी असायचे आणि नदीच्या वाहत्या प्रवाहाच्या वेगामुळे कपड्यावरील मळ निघून जायचा. साबण, डिटर्जंट या गोष्टी वापरात येण्याआधीचा हा काळ.

जसजशी संस्कृती विकसित होत गेली, लोकसंख्या वाढीला लागली तसतशी नद्यांचे किनारे, दगड ही साधनं तोकडी पडू लागली. मग परदेशांत कपडे धुण्याच्या पद्धतींमध्ये लाकडाचा कपडे धुण्याचा टब, पोझिंग टब, डॉली टब असे कपडे धुण्याच्या टप्प्यांसाठी अनेक पर्याय निर्माण झाले. पण यातही कपडे धुणं किचकट आणि वेळखाऊ होतं. यात कपडे धुण्याच्या आधी २४ तास साबणाच्या पाण्यात भिजवून ठेवावे लागायचे. ते धुण्यासाठीही पंधरा तास लागायचे. यामुळे लोकांचे कपडे धुण्याचं प्रमाण हळूहळू कमी झालं. या काळात



लोक तागाचे कपडे वापरायचे. सारखं कपडे धुण्याची गरज भासू नये म्हणून जास्तीच्या तागाच्या कपड्यांची घरात तरतूद असणं हे तेव्हा प्रतिष्ठेचं लक्षण मानलं जायचं.

प्राचीन इजिप्त, रोम या ठिकाणी कपडे धुण्यासाठी दिल्या जाणाऱ्या सेवा प्रसिद्ध होत्या. इथले लोक कपडे धुण्यासाठी प्रचंड आकाराची कुंडं वापरत. व्हाईट वॉश, पोटॅशियम किंवा सोडियम हायड्रॉक्साइडचा प्रखर द्राव, युरीन, पाणी यांचा वापर करून कपडे धुतले जायचे. रोमन आणि इजिप्शियन लोक कपडे धुण्यासाठी मानवी मुत्राचा वापर करत. त्याच्यात असलेला अमोनिया कपड्यांवर लागलेले ग्रीस विरघळवून कमी करत असे. त्यानंतर धोबी कपडे धोपटत आणि पाण्यात कपडे खळबळून काढत.

धुण्याआधी कपडे भिजवत असत. त्यासाठी प्राण्यांचे मांस आणि लाकडाची राख याचा उपयोग केला जात असे. नंतरच्या काळात साबणाचा लागलेला शोध या क्षेत्राला वेगळं वळण देणारा ठरला. साबण, डिटर्जंट सारख्या गोष्टींच्या वापरामुळे कपड्याचा मळ काढायला सोपं जातं हे लक्षात आलं आणि कपडे धुण्यासाठी त्याचा वापर होऊ लागला. साबणाच्या पाण्यात कपडे भिजल्यामुळे आपलं काम सोपं होतं हे लोकांच्या लक्षात आलं. परिणामी साबणाच्या पाण्यात भिजवून कपडे धुणं सुरू झालं.

कपडे धुण्यासाठी वॉशबोर्डचा वापर हा या प्रवासातला मैलाचा दगड आहे. हे वॉशबोर्ड्स वेगवेगळ्या प्रकारच्या सामग्रीपासून बनायचे. लाकूड, दगड, धातू, काच, उच्च तापमान सहन करू शकणारी माती यांचा वापर यासाठी केला जाई. पुढे हे वॉशबोर्ड्स जाऊन त्या जागी वॉशिंग मशीन आलं. अठराव्या शतकाच्या मध्यात इंग्लंडमध्ये पहिल्यांदा स्टॅन्डनरनी जगाला वॉशिंग मशीन या यंत्राची ओळख करून दिली. त्यानंतर अमेरिकेतील हॅमिल्टन स्मिथ यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन एक वॉशर ड्रम तयार केला. या ड्रममध्ये कपडे एका ब्लेडद्वारे फिरवले जात होते. दुसऱ्या एका प्रवादानुसार वॉशिंग मशीनचा शोध १८ व्या शतकाच्या सुरुवातीलाच फ्रान्समध्ये लागला. या वॉशिंग मशीनला व्हेंटिलेटर म्हटलं गेलं. या वॉशिंग मशीनमधल्या ड्रमला अनेक छिद्रं होती. या ड्रमच्या खाली असणाऱ्या विस्तवावर हा ड्रम फिरवला जात असे. १७९० मध्ये बीटमेन नावाच्या इंग्लिश माणसाने फक्त पाण्याच्या प्रवाहावर चालणाऱ्या वॉशिंग मशीनची निर्मिती केली होती. पण हा प्रयोग व्यवहारात उतरला नाही. एकोणिसाव्या शतकात जॉर्ज टी सॅपसन या संशोधकाला कपड्यांच्या ड्रायरचे स्वामित्व हक्क मिळाले. त्याचं संशोधन कपडे वाळवण्यासाठी उपयोगात आणलं गेलं. हे कपडे वाळवणं स्टोव्हमधील उष्णतेच्या साहाय्याने होत होतं. १९ व्या शतकापर्यंत रुग्णालय आणि लॉन्ड्रीजपुरताच या वॉशिंग मशीनचा उपयोग मर्यादित होता. अगदी सुरुवातीपासूनच वॉशिंग मशीन अर्धवर्तुळाकारात फिरत होती आणि यात वॉशबोर्डचाही वापर करण्यात आला होता. हे बोर्ड मशीनच्या तळाशी असलेल्या कातकाम केलेल्या शेगडीच्या विरुद्ध दिशेने फिरत. कपडे या दोन्ही थरांमध्ये स्वच्छ होईपर्यंत घासले जात. पण यात एक अडचण होती. ती म्हणजे खूप नाज़ूक असलेले धागे अतिउच्च ताणामुळे खराब होत. हीच गोष्ट त्याच्या सुधारणेसाठी महत्त्वाची ठरली. या घर्षण होणाऱ्या पृष्ठ भागामुळे कपडे कमकुवत होऊन ते लवकर विरण्यापासून रोखण्यासाठी त्या पृष्ठभागांमध्ये सुधारणा करण्यात आल्या. पूर्वी बनवलेली मशीन्स ही लाकूड आणि धातूच्या गिअरची असत. नंतर वॉशिंग मशीनची वाढती लोकप्रियता आणि कपडे धुण्याच्या पद्धतीत होत गेलेला बदल लक्षात घेऊन या क्षेत्रातील



तज्ञ कंपन्यांनी त्याच्या डिझाईनमध्ये स्वतःच लक्ष घातलं. १९०४ च्या दरम्यान आयडियल नावाच्या ब्रॅंडखाली होबजा या कंपनीने पहिल्या वॉशिंग मशीनची निर्मिती केली. स्वयंचलित धुण्याच्या प्रक्रियेचा आविष्कार म्हणजे या प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली सुधारणा. यामध्ये पूर्वी डॉली टब आणि लाकडी वॉशटबचा वापर केला जाई. शिवाय यामध्ये दट्टूया वापरून कपडे आपटण्याची व फिरवण्याची क्रिया केली जायची. यात सुधारणा घडवून आणल्या गेल्या. यापैकी एक म्हणजे पाणी खालच्या बाजूने गरम करून ते वापरणं. नंतर विजेचा शोध लागल्यावर रिंगर्सची (कपडे पिळण्यासाठी वापरलं जाणारं साधन) जागा स्पिन ड्रायर्सनी घेतली. पुढे त्यात कालानुरूप बदल होत गेले आणि आजचं स्वरूप साकारलं. आज वॉशिंग मशीनचे अनेक ब्रॅंड्स बाजारपेठेत उतरले आहेत. कपडे धुण्याचं काम जिकिरीचं, कष्टाचं राहिलेलं नाही. एका बाजूने विचार केला तर यामुळे शारीरिक कष्ट आणि वेळ वाचले आहेत हा याचा खूप मोठा फायदा आहे. पण दुसऱ्या बाजूने विचार केला तर कपडे धुताना होणारी शरीराची विशिष्ट प्रकारची हालचाल, कमरेत वाकणं, उकिडवं बसणं, कपडे आपटताना हाताच्या स्नायूंना होणारा व्यायाम, आणि कपडे धुण्याच्या निमित्ताने होणारं एक प्रकारचं सोशलायझेशन हे सगळं दूर गेलं आहे. म्हटलं तर फायदा म्हटलं तर तोटा असा हा मामला आहे. तुम्हाला काय वाटतं?

# विविध बँकांमध्ये खाते उघडून फसवणारी टोळी अटकेत, ५० बँक खात्यांद्वारे २० कोटींची फसवणूक

■ **पिंपरी: विशेष प्रतिनिधी**

ऑनलाइन टास्क देऊन फसवणूक करणारी आणि पिंपरी-चिंचवड, पुणे शहरातील रहिवाशांची विविध बँकांमध्ये खाती उघडून त्या खात्यांची माहिती सायबर चोरट्यांना उपलब्ध करून देणाऱ्या टोळीला पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अटक केली. खातेधारकाला प्रत्येकी दोन हजार रुपये देऊन खाते वापरले असून, ५० खात्यांद्वारे २० कोटींची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. अल्ताफ मेहबूब शेख (वय २४, जुनी सांगवी), मनोज शिवाजी गायकवाड (२३), हाफिज अली अहमद शेख (दोघे रा. दापोडी), अनिकेत भाऊराव गायकवाड (वय २२, रा. नवी सांगवी), पवन विश्वास पाटील (वय २२, रा. पिंपरी), चैतन्य संतोष आबनावे (वय २१), सौरभ रमेश विश्वकर्मा (वय २३, दोघे रा. पिंपळे गुरव) आणि कृष्णा भगवान खेडकर (वय २७, रा. बीड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. रावेत येथील एका व्यक्तीला फेब्रुवारीत समाजमाध्यमातील व्हॉट्सॲपवर अर्धवेळ नोकरीची लिंक आली होती. ती उघडल्यानंतर ते एका टेलिग्राम समूहात आपोआप समाविष्ट झाले. टास्क खरेदी करून पूर्ण केल्यास दीड हजार रुपये नफा मिळेल, असे सांगितले. समूहातील इतर सदस्यांनी मिळविलेल्या नफ्याची माहिती टाकली. त्यामुळे त्यांनी ३३०० रुपयांना टास्क खरेदी केले आणि ते पूर्ण केल्याने ५०० रुपये नफा दाखविण्यात आला.




मात्र, गुंतवणूक, तसेच नफ्याची रक्कम न मिळाल्याने देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच वेळी कर्नाटक बँकेचे पिंपरी शाखेच्या व्यवस्थापकांनी बँकेमध्ये ३४ पेक्षा अधिक खाती दोन महिन्यांत उघडण्यात आले असून, त्यामध्ये संशयास्पद व्यवहार होत असल्याचे पोलिसांना कळविले होते. खाते उघडणारे आणि खाते उघडण्यास लावणारे शहरातील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

कर्नाटक बँकेतील खातेधारक अल्ताफ याने मनोज आणि अनिकेतच्या सांगण्यावरून बँकेत दोन खाती उघडली. ती खाती मनोजला देऊन त्यापोटी चार हजार रुपये घेतल्याचे सांगितले. मनोजने ही खाती हाफिजला सायबर फसवणुकीसाठी दिल्याचे आणि त्या बदल्यात प्रत्येक खात्यासाठी पाच हजार रुपये घेतल्याचे कबूल केले. पवन याने चैतन्यच्या सांगण्यावरून खाते उघडले असून, त्या बदल्यात दोन हजार रुपये घेतले. चैतन्यने हे खाते सौरभला दिले. त्यापोटी दीड हजार रुपये घेतले. सौरभने ही खाती कृष्णाला दिली. त्या बदल्यात प्रत्येक खात्यासाठी पाच हजार रुपये घेतल्याचे निष्पन्न झाले. या आरोपींनी खातेधारकाला प्रत्येकी दोन हजार रुपये देऊन त्यांच्या नावावर कर्नाटक बँक, फेडरल, इक्विटास आणि साउथ इंडियन बँकांमध्ये खाती उघडली. खातेधारकांबाबत पोलिसांचा तपास सुरू असून, किरण आणि हाफिज ज्यांना खाते देत होते, त्यांचा शोध सुरू आहे. ५० पेक्षा अधिक बँक खात्यांद्वारे १६ तक्रारी राज्यात प्राप्त झाल्या आहेत. या खात्यांद्वारे २० कोटींपेक्षा जास्त रकमेची फसवणूक झाल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपींना फेडरल बँकेची खाते उघडून देणाऱ्यांची चौकशी सुरू असून, सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे तपास करत आहेत.

## दुबईत नोकरीच्या आमिषाने तरूणीची फसवणूक;भरोसा कक्षाने केली सुखरूप सुटका

■ **वसई: विशेष प्रतिनिधी**

दुबईमध्ये चांगल्या नोकरीचे आमिष दाखवून फसवूणक करण्यात आलेल्या एका तरुणीची भरोसा कक्षाच्या पोलिसांनी सुखरूप सुटका केली. गलेलठ्ठ पगाराचे आमिष दाखवून तिला एका एजटंने दुबईला पाठवून फसवणूक केली होती.

भाईंदर मध्ये राहणारी २९ वर्षीय तरुणी उच्चशिक्षित असून चांगल्या नोकरीच्या शोधात होती. तिला दिल्लीतील एक दलाल (एजंट)च्या संपर्कात आली. दुबईतील एका नामांकित हॉटेलमध्ये स्वागतिक (रिसेप्शनिस्ट) म्हणून नोकरी देण्याचे आश्वासन दिले. तिथे दिला महिन्याला सुमारे पावणे दोन लाख पगार मिळणार होता. परदेशी नोकरी करण्याचे स्वप्न पूर्ण होणार असल्याने ती तरूणी आनंदात होती. एप्रिल महिन्यात ती दुबईला गेली होती. मात्र दुबईला गेल्यावर तिची निराशा झाली.

एजंटने तिचे पारपत्र काढून घेतले



आणि एका हॉटेल मध्ये अन्य हलक्या कामासाठी ठेवले. राहण्याची देखील नीट व्यवस्था नव्हती. तिथे तिचा छळ सुरू झाला. तरी काहीतरी काम आहे म्हणून तिने सहन केले. मात्र दोन महिने तिचा छळ सुरू होता. तिची फसवणूक झाल्याचे लक्षात आले. तिच्या कुटुंबियांनी दिल्लीमधील एजंटला संपर्क केला. मात्र त्याने तिला दाद दिली नाही. त्यामुळे पीडित तरुणीच्या आईने याबाबत मिरा भाईदरर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या भाईदर येखील भरोसा कक्षाची मदत घेतली.

त्यानुसार भरोसा कक्षाच्या प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्वी शिंदे यांनी परराष्ट्र मंत्रालयाच्या संकेतस्थळावर जाऊन मदत या पोर्टलवर माहिती देण्यास सांगितली. मुलगी हॉटेल मालकाच्या ताब्यात होती. दुबईतील कायद्यानुसार तिला तेथे काम करणे बंधनकारक होते. मात्र तेजश्री शिंदे यांनी हॉटेलमालकाशी वाटाघाटी सुरू केल्या. तरुणीची तब्येत बरी नसल्याचे सांगून तिला उपचारासाठी भारतात पाठविण्याबाबत मन वळवले. पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त मिलिंद बल्लाळ यांनी केलेली मध्यस्ती आणि प्रयत्न यशस्वी ठरले आणि पीडित तरूणी सुखरूप भारतात आली

परदेशी नोकरी लावण्याचे आमिष दाखवून अनेकांची फसवणूक केली जाते. तेथील कायदे आणि नियम माहित नसल्याने भारतीय अडकून पडतात. त्यामुळे एजंटबरोबर असे व्यवहार करताना सावध रहावे असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## अश्लील चित्रफीत तयार करून १७ लाखांची खंडणी, घाटकोपर पोलिसांकडून गुन्हा दाखल

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

तरूणीची अश्लील चित्रीकरण करून ते समाज माध्यमांवर वायरल करण्याची धमकी देऊन रोख रक्कम व सोन्याचे दागिने अशी सुमारे १७ लाख रुपयांची खंडणी उकळणाऱ्याविरोधात घाटकोपर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपीविरोधात बलात्कार, खंडणी, धमकावणे व गुंगीचे औषध दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध सुरू असल्याचे पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. २४ वर्षीय पीडित तरूणीला २०२३ मध्ये आरोपीने घरी बोलावले होते. तेथे गुंगीचे औषध देऊन आरोपीने तिच्यावर अत्याचार




केला. त्याचे चित्रीकरण करून आरोपीने तिला धमकावण्यास सुरूवात केली. समाज माध्यमांवर चित्रीकरण वायरल करण्याची धमकी देऊन आरोपीने तिच्याकडून पैसे मागण्यास सुरूवात केली. घाबरलेल्या पीडित तरूणीने आतापर्यंत रोख पाच लाख रुपये आणि १६ तोळे सोने आरोपीला दिले. पण त्यानंतरही मागणी वाढल्यामुळे अखेर पीडित तरूणीने घाटकोपर पोलिसांकडे तक्रार केली. या तक्रारीवरून २१ वर्षीय आरोपीविरोधात घाटकोपर पोलिसांनी बलात्कार, खंडणी, धमकावणे व गुंगीचे औषध दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

## कल्याणमध्ये पदपथावर आईच्या कुशीत झोपलेल्या बाळाचे अपहरण, पोलिसांनी केली दोन जणांना अटक

■ **कल्याण: विशेष प्रतिनिधी**

कल्याण पश्चिमेत मुरबाड रस्त्यावरील व्हर्नन मेमोरिअल मेथाडिस्ट चर्चच्या बाहेरील पदपथावर एक भंगार विक्रेती महिला आपल्या बाळासह शनिवारी रात्री झोपली होती. ही महिला गाढ झोपली असल्याचे पाहून दोन जणांनी या महिलेच्या कुशीत झोपलेल्या बाळाचे विक्री करण्याच्या इराद्याने अपहरण केले. महात्मा फुले पोलीस ठाण्यात याप्रकरणी या महिलेने तक्रार करताच पोलिसांनी परिसरातील



सीसीटीव्ही चित्रण तपासून बारा तासाच्या आत दोन आरोपींसह बाळाला ताब्यात घेतले. महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने याप्रकरणाचा तपास केला. आयेशा शेख ही मुळची नाशिक जवळील सिन्नर फाट्यावर झोपडपट्टीत राहते. ती भंगार जमा करण्याचे काम कल्याणमध्ये करते. तिला एक सहा महिन्याचे बाळ आहे. नेहमीप्रमाणे दिवसभर कचरा वेचून ती शनिवारी रात्री कल्याण पश्चिमेतील व्हर्नन चर्चबाहेरील पदपथावर दिव्यांच्या उजेडात झोपली होती. तिच्या कुशीत तिचे अरबाज नावाचे बाळ झोपले होते. मध्यरात्रीच्या सुमारास दोन जणांनी या महिलेच्या कुशीतील बाळ पाहून त्याचे विक्री करण्याच्या इराद्याने अपहरण केले. तक्रारीनंतर पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे आरोपी उल्हासनगरमधील रहिवासी असल्याचे शोधून काढले.

## पुणे हादरले, सख्या मावस बहिणींवर ४ जणांनी केला सामूहिक अत्याचार

■ **पुणे: विशेष प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्याच्या पुर्वभागातील पारगाव कारखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील दोन अल्पवयीन मावस बहिणीवर चार जणांनी मिळून सामूहिक बलात्कार केल्याची खळबळ जनक घटना घडली आहे. सदर आरोपींनी मुलींवर अत्याचार केल्याचा व्हिडिओ काढून तो व्हिडिओ दुसऱ्याला दिला व त्यांनी तो व्हिडिओ त्यातील एका अल्पवयीन मुलीला दाखवून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले आहे.या प्रकरणी दोन अल्पवयीन मुलांसह एकुण पाच जणांवर पारगाव कारखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची फिर्याद पीडित मुलीच्या आईने पारगाव पोलीस ठाण्यात



दिली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की पारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका गावात दोन अल्पवयीन सख्ख्या मावस बहिणी घरात एकट्या असताना अवधूत राजू पंचरास, कुणाल कैलास बोऱ्हाडे , दोन अल्पवयीन मुले यांनी घरात घुसून दरवाजाला आतून कडी लावून, जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्यावर सामूहिक बलात्कार केला आहे. तसेच सदर आरोपींनी मुलींवर केलेल्या अत्याचाराचा व्हिडिओ तयार करून तो महेश सुभाष तांबे याला दिला होता. त्यानंतर महेश तांबे याने तो व्हिडिओ त्यातील एका मुलीला दाखवून तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केल्याने त्याच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चित्रीकरणाच्या माध्यमातून महिलेकडून खंडणी उकळली, आरोपीला पोलिसांकडून अटक

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

शीतपेयामतून गुंगीचे औषध देऊन ३६ वर्षीय महिलेवर अत्याचार करून त्याचे चित्रीकरण समाज माध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला कुर्ला पोलिसांनी अटक केली. आरोपीने पीडित महिलेकडून



अनेक वेळा खंडणीच्या स्वरुपात दागिने घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. तक्रारीनुसार, आरोपीने शीतपेयातून पीडित महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अत्याचार केला. त्यावेळी आरोपीने महिलेचे चित्रीकरण केले होते. या चित्रफितीच्या माध्यमातून आरोपी पीडित महिलेला धमकावत होता. आरोपीने पीडित महिलेकडून सोन्याच्या बांगड्या, कर्णफुले व ब्रेसलेट असे सुमारे दीड लाख रुपयांचे किंमतीचे दागिने घेतले. तसेच कल्याण येथील खडवली येथे नेऊन पीडित महिलेला चार दिवस डांबून ठेवले. याप्रकरणी महिलेने केलेल्या तक्रारीननंतर ३० वर्षीय आरोपीला कुर्ला पोलिसांनी अटक केली. त्याच्याविरोधात गुंगीचे औषध देणे, बलात्कार व खंडणी स्वीकारल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कल्याणमध्ये अल्पवयीन मुलीला बिअर पाजून लैंगिक अत्याचार

■ **कल्याण: विशेष प्रतिनिधी**

कल्याण पूर्वेत एका १४ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे गुरुवारी अपहरण करून तिला एका ढाब्यावर बिअर पाजली. नंतर तिला एका निर्जन ठिकाणी असलेल्या इमारतीच्या भागात नेऊन तिच्यावर आशीष पांडे या इसमाने लैंगिक अत्याचार केला. या प्रकरणी आशीष पांडे, त्याचा साथीदार अभिषेक डेरे यांच्यावर मुलीच्या आईच्या तक्रारीवरून कोळसेवाडी पोलिसांनी पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

या प्रकरणात यापूर्वी लैंगिक अत्याचार प्रकरणाचा आरोप असलेला आणि कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असलेल्या एका राजकीय पक्षाच्या माजी नगरसेवकाचा उल्लेख तक्रारदार कुटुंबीयांनी एक दृश्यध्वनी चित्रफितीत केला आहे. यामुळे खळबळ उडाली आहे. या माजी नगरसेवकाने मात्र आपल्याला बदनाम करण्यासाठी काही मंडळी हे कुटील डाव रचत आहेत, असा खुलासा माध्यमांकडे केला आहे.

आशीष पांडेला अटक करण्यात आली आहे. डेरे फरार आहे. पोलिसांनी सांगितले, पीडित अल्पवयीन मुलगी



कल्याण पूर्वेत ज्या भागात राहते त्याच भागात आरोपी आशीष पांडे राहतो. तो पीडित मुलीच्या वडिलांचा मित्र आहे. त्यामुळे पीडिता त्याला ओळखत होती. शाळेला सुट्टी असल्याने पीडित मुलगी तिच्या मैत्रिणीकडे गुरुवारी दुपारी गप्पा मारण्यासाठी गेली होती. पीडीत मुलीला पाहून आशीषने तिला तुझ्या वडिलांनी तुला बोलावले आहे. असे सांगून पिडितेला तिच्या मैत्रिणीतून घराबाहेर बोलविले.

आशीषने तिला स्वताच्या दुचाकीवर घेतले. त्यानंतर आशीषने आपला मित्र अभिषेक डेरे याला सोबत घेतले. तिघे नांदिवली भागातील एका ढाब्यावर गेले. तेथे आशीषने जबरदस्तीने पीडितेला बिअर पाजली. बिअर प्यायली नाहीतर तुझ्या कुटुंबीयांना ठार मारण्याची धमकी आशीषने पीडितेला दिली. पीडितेला जबरदस्तीने पिअर पाजण्यात आली. त्यामुळे पुढे काय झाले तिला समजले नाही. आशीषने नंतर तिला एका निर्जन स्थळी असलेल्या इमारतीत नेले. तेथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. दुपारी घराबाहेर गेलेली मुलगी संध्याकाळ झाली तरी घरी आली नाही म्हणून पालकांनी तिचा शोध सुरू केला. तिच्या मैत्रिणीला विचारणा करण्यात आली. त्यावेळी तिने ती आशीष पांडे यांच्या सोबत गेली असल्याचे समजले. त्यानंतर रात्रीच्या वेळेत पीडिता ती राहत असलेल्या घराच्या परिसरात गुंगीत असल्याचे कुटुंबीयांना दिसले. दुसऱ्या दिवशी तिला विश्वासात घेऊन पालकांनी तिला घडल्या प्रकाराविषयी विचारले. त्यावेळी आशीष पांडे यांनी आपले अपहरण करून आपणास जबरदस्तीने बिअर पाजली. आणि आपल्यावर लैंगिक अत्याचार केला आहे, असे तिने कुटुंबीयांना सांगितले.

## जीवे मारण्याची सुपारी असल्याचे सांगत १२ लाखाची खंडणी उकळली

■ **सांगली: विशेष प्रतिनिधी**

पुण्यातील पार्टीला मारण्याची सुपारी दिल्याचे सांगत १२ लाखाची खंडणी उकळण्याचा प्रकार सांगलीत घडला असून या प्रकरणी पाच जणाविरूध्द संजयनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्तरमिया शेख (रा. सह्याद्रीनगर) यांना मोबाईलवर फोटो दाखवून तुम्हाला जिवे मारण्याची सुपारी पुण्याच्या पार्टीला दिली असल्याचे यासीन इनामदार (रा.




हडको कॉलनी) याने सांगितले. सुपारी घेतलेल्या पार्टीची भेट घालून देण्यासाठी कराड येथे नेले. शेख आणि नातेवाईक यांची कराडमध्ये भेट घालून देण्यात आली.

जीव वाचविण्यासाठी त्यांनी ६० लाख रूपयांची खंडणी मागितली. यानंतर १७ मे रोजी शेख यांना रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवत ठार मारण्याची धमकी देत १२ लाख रूपयांची खंडणी उकळली. या प्रकरणी संजयनगर पोलीस ठाण्यात इनामदार आणि चार अनोळखी अशा पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नवऱ्यावर करणी केल्याच्या संशयातून महिलेचा कुत्र्याकरवी चावा

■ **सांगली: विशेष प्रतिनिधी**

पतीवर करणी करून चहातून विष दिले असल्याचा आरोप करत अंगावर कुत्रा सोडून त्याच्याकडून चावा घेण्याचा प्रकार नांगोळे (ता. कवठेमहांकाळ) येथे घडला. कुत्रा चावल्याने महिला जखमी झाली असून या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी, गंगुबाई उत्तमखोत यांचे शेणखत भरण्याचे काम सुरू होते. यावेळी खत भरण्यासाठी शेजारी राहणारा श्रीकांत खोत हा कामासाठी आला होता. कामगारांनी खत भरत असताना चहा मागितला. चहा करून दिल्यानंतर त्या ठिकाणी आलेल्या श्रीकांत



खोत यांची पत्नी सोनाबाई खोत या त्या ठिकाणी आल्या. त्यावेळी नवऱ्यावर करणी केली असून चहातून विष दिले असल्याचा आरोप करत शिवीगाळ केली. तसेच सोबत असलेला कुत्राही फिर्यादी महिलेच्या अंगावर सोडण्यात आला. यामुळे कुत्र्याने पायाला चावा घेतल्याने त्या जखमी झाल्या आहेत.

## आंध्र प्रदेश, तामिळनाडुच्या चोरांकडून २२ भ्रमणध्वनी जप्त; नाशिक स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी




■ **नाशिक: विशेष प्रतिनिधी**

भ्रमणध्वनी चोरी करणाऱ्या आंध्र प्रदेश आणि तामिळनाडु येथील आंतरराज्य टोळीकडून २२ भ्रमणध्वनी नाशिकच्या स्थानिक गुन्हे शाखा एकने ताब्यात घेतले आहेत. शहर परिसरात वारंवार रहिवासी वस्ती, बाजारपेठांमधून नागरिकांचे भ्रमणध्वनी चोरीच्या घटना घडत असल्याने चोरट्यांच्या शोधासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी पोलिसांना सूचना केल्या होत्या.

पंचवटी परिसरातून एकाच दिवशी पाच भ्रमणध्वनी चोरीस गेल्यानंतर पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करत असतांना स्थानिक गुन्हे शाखा एकला आंध्र प्रदेश आणि तामिळनाडु येथील भ्रमणध्वनी आणि लॅपटॉप चोरी करणारी टोळी नाशिक शहरात आली असल्याची माहिती मिळाली. गुन्हे शाखेच्या वतीने सापळा रचत इंद्रा डुमप्पा, दुर्गेश कृष्णमूर्ती (रा. आंध्र प्रदेश), बालाजी सुब्रमणी (रा. तामिळनाडु) यांना ताब्यात घेतले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून अंदाजे दोन लाख, ३८ हजार २०० रुपयांचे २२ भ्रमणध्वनी जप्त केले. संशयितांना पंचवटी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## शिवडीतील हत्येप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

शिवडी येथे ५० वर्षीय व्यावसायिकाची हत्या केल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हसमभाई काण्या असे मृत व्यक्तीचे नाव असून याप्रकरणी पोलीस तिघांचा शोध घेत आहे.

शिवडी येथील ब्रीक बंदर नजिकच्या गॅरेजजवळ ही घटना घडली. तक्रारदार उस्मान अहमद ऊर्फ शकील शेख हे वांद्रे येथील बेहरामपाडा परिसरात राहतात. शिवडीतील ब्रीक बंदर परिसरात त्यांच्या मालकीचे एक गॅरेज आहे. त्यांच्याच गॅरेजच्या बाजूला




हसमभाई काण्या यांचा भंगार विक्रीचा व्यवसाय आहे. गेल्या नऊ वर्षांपासून ते एकमेकांना ओळखतात. ते चांगले मित्र होते.

शनिवारी दुपारी एक वाजता शेख उस्मान त्यांच्या गॅरेजमध्ये काम करत होते. यावेळी तिथे तीन तरुण आले आणि त्यांनी जुन्या वादातून हसमभाई यांच्यावर चाकूने हल्ला केला. यावेळी शेख उस्मान यांनी तिघांनाही जाब विचारला असता त्यांनी त्यांनाच जिवे मारण्याची धमकी दिली. या हल्ल्यानंतर ते तिघेही दुचाकीवरून लक्ष्मी पेट्रोल पंप आणि सीआरपीएच्या दिशेने पळून गेले. हल्ल्यात जखमी झालेल्या हसनभाई यांना शेख उस्मानसह इतरांना तातडीने भायखळा येथील मसीना रुग्णालयामध्ये दाखल केले. तिथे त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# अगरवाल पिता-पुत्राविरुद्ध आणखी एक गुन्हा, जमीन व्यवहारात छोटा राजनच्या नावाने धमकावून फसवणूक

■ पुणे: विशेष प्रतिनिधी

कल्याणीनगर अपघात प्रकरणातील आरोपी बांधकाम व्यावसायिक विशाल अगरवाल आणि त्याचे वडील सुरेंद्र यांच्याविरुद्ध आणखी एक गुन्हा दाखल झाला आहे. कोंढवा भागातील जमीन व्यवहारात कुख्यात गुन्हेगार छोटा राजनचे नाव सांगून एक कोटी ३२ लाख रुपयांची फसवणूक करून जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी अगरवाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक सुरेंद्र ब्रह्मदत्त अगरवाल (वय ७७), मुलगा विशाल (वय ५०), जसप्रीतसिंग राजपाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मुश्ताक शब्बीर मोमीन (वय ४५, रा. कौसरबाग, कोंढवा) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मुश्ताक मोमीन यांची एम. एम असोसिएट्स आणि वास्तू प्रॉपर्टीज एजन्सी आहे. मोमीन यांच्याकडून बांधकाम परवानगी मिळवून देणे, तसेच जमीन खरेदी-विक्री व्यवहार करण्यात येतात. आरोपी अगरवाल आणि जसप्रीतसिंग राजपाल यांचे कोंढव्यातील ब्रह्मा काऊंटी सोसायटीच्या परिसरात असलेल्या जमिनीवरून निवृत्ती कोपरे यांच्याशी वाद झाले होते. अगरवाल जुलै २०१९ मध्ये मोमीन यांना भेटले. जमिनीचा वाद मिटवून देणार का, अशी विचारणा केली. त्या वेळी परवानगी, तसेच अन्य कामे मार्गी लावून वाद मिटवून देतो, असे मोमीन यांनी त्यांना सांगितले.

या प्रकरणात मध्यस्थी केल्यास दीड कोटी रुपये देण्याचा करार करण्यात आला होता. अगरवाल आणि राजपाल यांनी मोमीन यांना हे प्रकरण मार्गी लावण्यासाठी १८ लाख रुपये आगाऊ दिले होते. उर्वरित एक कोटी ३२ लाख रुपये जमिनीसंदर्भातील कामे पूर्ण झाल्यानंतर देण्याचे आश्वासन आरोपींनी दिले होते. मोमीन यांनी अगरवाल यांना जागेचा कायदेशीर ताबा मिळवून दिला. ३१ जुलै रोजी कोपरे कुटुंबीय आणि सुरेंद्र अगरवाल यांच्यात करारनामा झाला. मोमीन यांनी जमिनीच्या परिसरात सीमाभिंत बांधली. तेथे सीसीटीव्ही कॅमेरे बसवून दिले. अगरवाल यांनी दिलेले १८ लाख रुपये खर्च झाल्याने मोमीन यांनी अगरवाल आणि राजपाल यांच्याकडे उर्वरित पैशांची मागणी केली. तेव्हा आरोपींनी मोमीन यांना लष्कर भागातील महात्मा गांधी रस्त्यावर असलेल्या कार्यालयात बोलावून घेतले. 'तुला आणि तुझ्या कुटुंबीयांना जगायचे आहे का? जेवढे पैसे दिले आहेत. त्यावर समाधान मान अन्यथा खंडणीचा गुन्हा दाखल करून तुला तुरुंगात पाठवू', अशी धमकी अगरवाल यांनी मोमीन यांना दिली. त्यावर मोमीन यांनी पोलीस आयुक्तालयात तक्रारअर्ज दिला. त्यानंतर अगरवाल आणि जसपाल यांनी पुन्हा मोमीन यांना बोलावून घेतले आणि जिवे मारण्याची धमकी दिली. मोमीन यांनी लष्कर न्यायालयात खासगी तक्रार दाखल केली. तेव्हा मोमीन यांना पुन्हा धमकावण्यात आले. दि. ३ मार्च २०२१ रोजी मुंबई उच्च न्यायालयात मोमीन आणि अगरवाल यांची भेट झाली. तिथे न्यायालयाच्या इमारतीवरून फेकून देण्याची धमकी त्यांना देण्यात आली. दरम्यान, 'छोटा राजनशी आमचे थेट संबंध आहेत. अजय भोसलेवर गोळीबार झाल्याची घटना माहिती आहे ना? तो वाचला, तू वाचणार नाहीस', अशी धमकी अगरवाल पिता-पुत्राने दिल्याचे मोमीन यांनी फिर्यादीत म्हटले आहे.





# NEET वादग्रस्त निकाल प्रकरणः वीस हजार विद्यार्थ्यांनी घेतली सर्वोच्च न्यायालयात धाव

■ मुंबई: विशाल कारंडे

वादग्रस्त ठरलेल्या नीट निकालाविरोधात देशातील जवळपास २० हजार विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेत नीट पुन्हा घेण्यात यावी किंवा श्रेणी गुण पद्धत रद्द करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने घाई-गडबडीत जाहीर केलेला नीटचा निकाल वादग्रस्त ठरला आहे. या निकालाबाबत विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे कोटा येथील मोशन एज्युकेशन संस्थेने नीट परीक्षेतील गैरप्रकारांबाबत डिजिटल सत्याग्रह सुरु केला आहे. त्यात २० हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत.




या सत्याग्रहाचा एक भाग म्हणून कोटा येथील शिक्षणतज्ज्ञ नितीन विजय यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. नीट परीक्षेत ६७ विद्यार्थी हे प्रथम क्रमांकावर आहेत. नीटच्या परीक्षेत नकारात्मक गुण पद्धत असल्याने सर्व प्रश्न सोडविणाऱ्या विद्यार्थ्याचा एक प्रश्न चुकला तरी त्याला ७२० पैकी ७१५ गुण मिळणे अपेक्षित आहे. मात्र विद्यार्थ्यांना ७१८, ७१९ गुण कसे दिले गेले, असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहेत. क्लॅटसाठी अतिरिक्त गुण देण्याच्या सूचना न्यायालयाने २०१८ मध्ये दिल्या होत्या. त्याचा हवाला एनटीएकडून देण्यात येत आहे. परंतु ती परीक्षा ऑनलाइन होती तर नीट ही ऑफलाइन आहे.

# ठाण्याचे पोलीस हवालदार रामनाथ मेंगाळ यांची दक्षिण अफ्रिकेच्या अप हिल मॅरेथॉनमध्ये यशस्वी कामगिरी

■ ठाणे: नितीन देवळेकर

ठाणे शहर वाहतूक शाखेचे पोलिस हवालदार रामना मेंगाळ यांनी दक्षिण अफ्रिकेतील डर्बन येथे आयोजित केलेल्या कॉमरेड मॅरेथॉन स्पर्धेत यंदा सलग तिसऱ्या वर्षी यशस्वी कामगिरी केली आहे. मेंगाळ यांनी ११ तास २८ मिनिटे आणि २२ सेकंदामध्ये अप हिलचे ८५.९१ किलोमीटरचे अंतर यशस्वीरित्या पूर्ण केले.

मेंगाळ हे वाहतूक शाखेच्या कापूरबावडी युनिटमध्ये नेमणूकीला आहेत. डर्बन येथे ९ जून २०२४ रोजी पार पडलेल्या या मॅरेथॉनमध्ये जगभरातील धावपटून सहभाग घेतला होता. याच स्पर्धेत मेंगाळ सहभागी झाले होते. ही स्पर्धा यशरित्या पूर्ण करुन त्यांनी ठाणे शहर पोलिस दलाचे आणि महाराष्ट्राचे नाव लौकिक केल्याचे पोलिस उपायुक्त डॉ. विनय राठोड यांनी सांगितले. अतिशय खडतर आणि प्रतिष्ठेच्या या मॅरेथॉनमध्ये नावलौकिक मिळविणारे ठाणे शहर पोलिस दलातील मेंगाळ हे पहिलेच कर्मचारी ठरले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल पोलिस आयुक्तालयाच्या वतीने त्यांचा सत्कारही केला जाणार असल्याचे डॉ. राठोड यांनी सांगितले.




# लोकसभेवर निवडून येऊनही नारायण राणे यांना डच्चू

■ मुंबई: सचिन कदम

लोकसभा निवडणुकीत रत्नागिरी- सिंधुदुर्ग मतदार संघातून निवडून येऊनही केंद्रीय मंत्रिमंडळातून नारायण राणे यांना वगळण्यात आले. अडीच वर्षांच्या मंत्रीपदाच्या कारकीर्दीत राणे फारसा प्रभाव पाडू न शकल्यानेच त्यांना डच्चू



देण्यात आल्याचे भाजपच्या वर्तुळातून सांगण्यात येते. नारायण राणे हे गेली अडीच वर्षे लघू, सूक्ष्म उद्योग खात्याचे मंत्री होते. लोकसभेवर निवडून आल्याने मंत्रिमंडळात पुन्हा समावेश केला जाईल, असा त्यांना ठाम विश्वास होता. पण मोदी यांच्या नवीन मंत्रिमंडळात राणे यांना संधी देण्यात आलेली नाही. भाजपने राणे यांना राज्यसभेची पुन्हा उमेदवारी नाकारली होती. लोकसभेच्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून लढण्याची गळ त्यांना घालण्यात आली. तब्येत साथ देत नसल्याने राणे हे लोकसभा निवडणूक लढण्याबाबत फारसे उत्सुक नव्हते. विधानसभा निवडणुकीत लागोपाठ दोन पराभवानंतर राणे यांनी राज्यसभा अथवा विधान परिषद या दोन सभागृहांत मागील दारानेच प्रवेश केला होता. पराभवाचा शिक्का पुसून काढण्यासाठी नारायण राणे यांनी विजयाकरिता सारी ताकद पणाला लावली होती.

# 'पंकजा मुंडे पराभूत झाल्या तर जीव देईन', अशी धमकी देणाऱ्या व्यक्तीचा बस अपघातात मृत्यू

■ बीड: रघुवीर जाधव

बीड लोकसभेच्या भाजपाच्या नेत्या पंकजा मुंडे यांचा निवडणुकीत पराभव झाला तर मी जीव देईन, अशी धमकी एका कार्यकर्त्याने दिली होती. या धमकीचा व्हिडीओ सदर व्यक्तीने प्रसारित केला होता. या व्यक्तीचा बस अपघातात शुक्रवारी दुर्दैवी मृत्यू झाल्याचे आता समोर आले आहे. पोलिसांनी ही आत्महत्या असू शकते, असा प्राथमिक अंदाज वर्तविला आहे.



शुक्रवारी रात्री अहमदपूर-अंधोरी रस्त्यालगत असेलल्या बोरगाव पाटी येथे झालेल्या अपघातात ३८ वर्षीय सचिन कोंडिबा मुंडे यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सदर मृत व्यक्ती लातूरच्या अहमदपूर तालुक्यातील येस्तर या गावचा रहिवासी होता. पोलिसांनी सांगितले की, ज्या बसमुळे अपघात झाला त्याच्या चालकाला अटक करण्यात आले आहे. मुंडेंचा मृत्यू अपघातामुळे झाला की ही आत्महत्या होती, याचा तपास सुरू आहे. येलदरवाडी येथे रात्री मुक्कामी आलेली बस बोरगाव पाटी येथे थांबली होती. बस रिव्हर्स घेत असताना मागे उभा असलेला सचिन बसखाली चिरडला गेला. किनगाव पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी भाऊसाहेब खंदारे या अपघाताची चौकशी करत आहेत. यासाठी महाराष्ट्र एसटी महामंडळाची सदर बस तपासासाठी जप्त करण्यात आली आहे. मृत सचिन मुंडे हा अविवाहित असून तो आपल्या पालकांबरोबर राहत होता. त्याल एक भाऊही आहे. त्याने दोन दिवसांपूर्वी एक व्हिडीओ प्रसारित केला होता. ज्यात तो म्हटला की, पंकजा मुंडेंचा पराभव झाला तर मी जिवंत राहणार नाही. हा व्हिडीओ बराच व्हायरल झाला होता. सचिन मुंडेंच्या कुटुंबियांनी सांगितले की, निकाल लागल्यापासून सचिन तणावात होता. ५ जून पासून त्याने अबोला धरला होता. शनिवारी सकाळी सचिन मुंडेंवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# जिल्ह्यात चार ठिकाणी अतिवृष्टीः ओढे, नाले दुथडी

■ सांगली: माधव अलवा

जिल्ह्यात पहिल्याच पावसाने दमदार हजेरी लावत जिल्ह्यात चार ठिकाणी अतिवृष्टी नोंदवली. गेल्या २४ तासांत चरण ता. शिराळा येथे ११३.३ मिलीमीटर पाउस झाला असून सरासरी ३३.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. पावसाने सांगली बंधारा ओसंडून वाहत असून दसऱ्या पर्यत कोरडी राहणारी दुष्काळी भागातील अग्रणी नदी वाहती झाली आहे. पावसामुळे २० हून अधिक जिल्हा मार्ग, पाणंद रस्ते बंद झाले आहेत.

शनिवारी सायंकाळपासून जिल्ह्यात दमदार पाउस सुरू झाला होता. रात्रभर काही ठिकाणी मध्यम ते हलयया सरी वारंवार पडत होत्या. या भीज पावसाने रानात फूट-दोन फूट पाणी साचले असून ओढे नाले दुथडी भरू न वाहू लागल्याने पाणंद रस्ते, गावओढ्यावर पाणी आल्याने मार्ग बंद झाले. मिरज मालगाव हा मिरज ओढा आल्याने वाहतुकीस आज बंद ठेवण्यात आला होता, तर नावरसवाडी पूलावर पाणी आल्याने सांगली नांद्रे आणि



काकडवाडी फरशी ओढ्यावर पाणी आल्याने मिरज तासगाव मार्ग वाहतुकीसाठी बंद राहिला. मृग नक्षत्राच्या प्रारंभी प्रामुख्याने पश्चिम भागातील शिराळा तालुययात जोरदार पावसाचा सुरूवात होते. मात्र, यंदाच्या हंगामात हा पायंडा बदलला असून आटपाडी तालुययात जोरदार पर्जन्यवृष्टी झाली आहे. दिघंची ओढा गेल्या २० वर्षानंतर प्रथमच दुथडी भरून वाहू लागला, यामुळे दिघंची आटपाडी हा मार्ग काही काळासाठी बंद ठेवण्यात आला होता. गेल्या २४ तासात जिल्ह्यात सरासरी ३३.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. तर कवलापूर ९७.३, कासेगाव ७८ चरण ११३.३ आणि आटपाडी ९१.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून ही अतिवृष्टी आहे. जत, पलूस तालुके वगळता अन्य ठिकाणी चांगल्या पावसाची नोंद झाल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. तालुकानिहाय गेल्या २४ तासांत झालेला पाउस असा मिरज ३१.९, जत ०.७, खानापूर २९.४, वाळवा ४८.४, तासगाव २३.६, शिराळा ५८.२, आटपाडी ६७.३, कवठेमहांकाळ ३२.५, पलूस ७.५ आणि कडेगाव ९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

पश्चिम घाटात पाउस सुरू झाला असून कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील महाबळेश्वर येथे ४१ तर नवजा येथे ५६ मिलीमीटर पाउस झाला. रविवारी सकाळी आठ वाजता कोयना धरणात १५.२६ तर चांदोली धरणात १०.३८ टीएमसी पाणीसाठा असल्याचे जलसंपदा विभागाकडून कळविण्यात आले आहे

# '...म्हणून अजित पवार गटाला मंत्रिपद नाही'; दाऊदच्या प्रॉपर्टीचा उल्लेख करत संजय राऊतांचा मोठा दावा

■ मुंबई: संजीनी खाडे

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा शपथविधी सोहळा पार पडला असून ७१ मंत्र्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यावेळी महाराष्ट्राच्या वाट्याला काय आलं? असा थेट सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी विचारला. कारण, सात खासदार असलेल्या शिंदे गटाला एक राज्यमंत्री पद देण्यात आलंय. तर, एक खासदार असलेल्या अजित पवार गटालाही एक राज्यमंत्री पद देण्यात येत होते. परंतु, त्यांनी ते नाकारले. यावरून संजय राऊतांनी आज भाजपासह शिंदे आणि अजित पवार गटावर टीका केली. तसंच, प्रफुल्ल पटेलांबाबतही मोठा दावा केला आहे.

'काल नरेंद्र मोदी यांनी शपथ घेतली. हे मोदी सरकार नाही किंवा भाजपाचं सरकार नाही. मोदींचं सरकार, मोदी तिसरी बार, मोदी गॅरंटी, सबकुछ मोदी असं काल चित्र नव्हतं. एक कॅबिनेट त्यांनी ओढून ताणून बनवलं आहे. चंद्राबाबू आणि नितीश बाबू या टिपूंचा इतिहास सर्वांना माहितेय. महाराष्ट्राच्या वाट्याला काय आलं? पियुष गोयल मंत्री झाले. ते स्टॉक एक्स्जेंच वाल्यांचे मंत्री आहेत. अजित पवारांच्या वाट्याला भोपळा आला आहे. दुसरे आहेत नकली शिवसेना. त्यांच्या तोंडावर राज्यमंत्री पद फेकलं आहे. त्यांना मंत्रिपद मिळायचं असतं तर कालच मिळालं असतं. नकली शिवसेनेचे सात खासदार आहेत, यांना त्यांची औकात दाखवली गेली. तुम्ही आमचे आश्रित आहात, असं भाजपाने दाखवून दिलंय', असं संजय राऊत म्हणाले.



दरम्यान, राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांना राज्यमंत्री पद देऊ केलं होतं. परंतु, अजित पवार गटाने हे मंत्रिपद नाकारलं. यावरून संजय राऊतांनी मोठा दावा केला आहे. 'अजित पवारांच्या बाबतीत आम्हाला असं समजलंय की, दाऊदशी संबंधित असलेली प्रफुल्ल पटेलांची १५० कोटींची प्रॉपर्टी क्लिअर केली. अजून काय पाहिजे? ईडीने जप्त केलेली ही प्रॉपर्टी क्लिअर केली. त्यांच्यावरील सर्व गुन्हे मागे घेतले गेले. मग मंत्रिपद कशाला पाहिजे?', असं संजय राऊत म्हणाले.

दरम्यान, त्यांनी एकच खासदार निवडून आलेल्या जतिनराम मांजी यांचाही उल्लेख केला. ते म्हणाले की, 'एकच खासदार निवडून आलेल्या जतिनराम मांजी यांना केंद्रीय मंत्रिमंडळात संधी देण्यात आली, परंतु अजित पवार गटाला मंत्रिपद दिलं नाही.' राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील महत्त्वाच्या घटक पक्षांना कॅबिनेट दर्जाचे मंत्रिपद देण्यात आले आहे. लोकसभेत एक आणि राज्यसभेत एक असे दोनच खासदार असलेल्या राष्ट्रवादीला एक राज्यमंत्रीपद (स्वतंत्र कार्यभार) देण्याची तयारी भाजपने दर्शविली. राष्ट्रवादीच्या वतीने प्रफुल्ल पटेल यांना केंद्रीय मंत्रिमंडळात संधी दिली जाणार होती. मात्र ते कॉंग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असल्याने आता राज्यमंत्रीपद स्वीकारणे योग्य ठरणार नसल्याचे पटेल यांचे म्हणणे होते.

# सात खासदार असलेल्या शिंदे गटाला एकच राज्यमंत्रीपद

■ मुंबई: राकेश गायकवाड

सात खासदार असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्रीपद देऊन बोळवण करण्यात आली, पण त्याच वेळी कुमारस्वामी, चिराग पासवान किंवा जीतनराम मांझी या शिंदे यांच्या पक्षापेक्षा कमी खासदार असलेल्या नेत्यांना कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले आहे. यावरून भाजपने महाराष्ट्रातील शिंदे व अजित पवार या दोन्ही मित्र पक्षांना फारसे महत्त्व दिलेले नाही हेच स्पष्ट होते. एकच खासदार असलेल्या राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला राज्यमंत्रीपद देण्याची तयारी दर्शवून अजितदादांना फारसे महत्त्व देत नाही हे दाखवून दिले. राज्यात भाजपला सत्तेत आणण्यासाठी महत्वाची कामगिरी बजावलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची भाजपने केवळ एक राज्यमंत्रीपद (स्वतंत्र कार्यभार) देऊन बोळवण केली आहे. तेलुगू देसमचे १६ तर संयुक्त जनता दलाचे १२ खासदार असल्याने या पक्षांना मंत्रिमंडळात प्रत्येकी दोन मंत्रिपदे देण्यात



आली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या शिवसेना शिंदे गटाचे सात खासदार असूनही केवळ एक राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) देण्यात आले आहे. पाच खासदार असलेले चिराग पासवान, तीन खासदार असलेले संयुक्त जनता दलाचे कुमारस्वामी किंवा केवळ एकच खासदार असलेल्या बिहारमधील हिंदुस्थानी अवामी मोर्चाचे जीनतराम मांझी यांची कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. कमी खासदार असलेल्या पक्षांना कॅबिनेट मंत्रिपदे देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री शिंदे यांच्या शिवसेनेला कॅबिनेट दर्जाचे मंत्रिपद देण्यात काहीच हरकत नव्हती. पण शिंदे यांनी फार आग्रह धरला नसावा किंवा भाजपने त्यांची मागणी मान्य केली नसावी. अजित पवार गटाच्या प्रफुल पटेल यांच्यासाठी कॅबिनेट मंत्रिपदाची मागणी भाजपने मान्य केली नाही. यावरून भाजप राज्यातील शिंदे व अजित पवार गट या दोन्ही मित्र पक्षांना फारसे महत्त्व देत नाही हेच पुन्हा सिद्ध झाले. त्याच वेळी राज्यातून नऊ खासदार निवडून आलेल्या भाजपने आपल्या चौघांचा मंत्रिमंडळात समावेश केला आहे.

# राष्ट्रवादीला कॅबिनेट मंत्रिपद नाकारले: राज्यमंत्रीपद स्वीकारण्यास अजित पवार गटाचा नकार

■ मुंबई: सम्यक कासारे

लोकसभा निवडणुकीतील अपयशामुळे केंद्रीय मंत्रिमंडळात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला कॅबिनेट दर्जाचे मंत्रीपद देण्यास भाजपकडून स्पष्टपणे नकार देण्यात आला. राष्ट्रवादीला स्वतंत्र कार्यभार असलेले राज्यमंत्री देण्याची तयारी दर्शविण्यात आली होती. मात्र अजित पवार गटाचा कॅबिनेट मंत्रिपदासाठी आग्रह कायम राहिल्याने अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नवीन सरकारमध्ये पक्षाला स्थान मिळालेले नाही. नजिकच्या काळात अजित पवार गट केंद्रात सहभागी होण्याबाबतही साशंकता आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील महत्त्वाच्या घटक पक्षांना कॅबिनेट दर्जाचे मंत्रिपद देण्यात आले आहे. लोकसभेत एक आणि राज्यसभेत एक असे दोनच खासदार असलेल्या राष्ट्रवादीला एक राज्यमंत्रीपद (स्वतंत्र कार्यभार) देण्याची तयारी भाजपने दर्शविली. राष्ट्रवादीच्या वतीने प्रफुल्ल पटेल यांना केंद्रीय मंत्रिमंडळात संधी दिली जाणार होती. मात्र ते कॉंग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असल्याने आता राज्यमंत्रीपद स्वीकारणे योग्य ठरणार नसल्याचे पटेल यांचे म्हणणे होते. एकच खासदार निवडून आलेल्या जतिनराम मांजी यांना लावलेला न्याय राष्ट्रवादीबाबत लावण्यात आला नाही. बंड केल्यावर अजित पवार यांनी शरद पवार यांच्या वर्चस्वाला शह द्यावा अशी भाजप नेतृत्वाची अपेक्षा होती. मात्र लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाचे आठ खासदार निवडून आले. याउलट अजित पवार गटाचा एकच खासदार निवडून आला. ते बारामतीची जागाही जिंकू शकले नाहीत. यामुळेच कॅबिनेट दर्जाच्या मंत्रिपदाचा आग्रह भाजपने मान्य केला नसल्याची माहिती आहे. यात राज्यातील भाजपच्या एका बड्या नेत्याची भूमिका महत्त्वाची ठरल्याची चर्चा आहे. या घडामोडींमधून भाजप अजित पवार यांना फारसे महत्त्व देत नाही हेच स्पष्ट झाले.

